- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शुक्रवार, १० जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २११ | किंमत : २ रूपये


**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-


**विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...**

विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...

- दैनिक सिंहवाणी वृत्त -

९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६



**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**

नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...


- आजच संपर्क करा -

८६९८७८८६६६

९६५७२३२०२६


# राज्यातील २०११ पूर्वीच्या सर्व झोपड्यांना संरक्षण

- पुनर्वसनासाठी ३ महिन्यांत सर्वेक्षण पूर्ण करणार
- सरकारी, वन आणि सिडकोच्या जमिनींवरील रहिवाशांना दिलासा
- मुख्यमंत्र्यांच्या मंजुरीनंतर महसूलमंत्री बावनकुळे यांची मोठी घोषणा



**दै. सिंहवाणी वृत्त,मुंबई**
राज्यातील सरकारी, वन तसेच केंद्र व राज्य सरकारच्या विविध प्राधिकरणांच्या जमिनींवर एक जानेवारी २०११ पूर्वी उभारण्यात आलेल्या सर्व घरांना (झोपड्यांना) सरकार पूर्ण संरक्षण देणार असून, त्यांचे 'एसआरए', 'म्हाडा' किंवा इतर गृहनिर्माण योजनांच्या माध्यमातून योग्य पुनर्वसन केले जाईल, अशी महत्त्वपूर्ण घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत केली. या अंतर्गत मुंबई उपनगरासह राज्यातील अशा सर्व जमिनींवरील रहिवाशांचे येत्या तीन महिन्यांत विस्तृत सर्वेक्षण पूर्ण केले जाईल, अशी ग्वाही ही महसूलमंत्र्यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीत या धोरणाला मंजुरी दिली असून, त्यानुसार आता राज्यभरात युद्धपातळीवर कार्यवाही सुरू करण्यात आली असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

**विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती**

मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि कोकण विभागातील कांदळवन (मॅन्ग्रोव्हज), वन जमीन, महसूल, नझुल तसेच सिडकोच्या जमिनींवर मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण झाले आहे. विकास आराखडा, पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र किंवा वन विभागाचे कडक नियम असल्यामुळे अनेक ठिकाणी या जमिनींवरील घरे त्याच जागी नियमित करणे शक्य नाही. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी कोकण विभागीय आयुक्तांच्या माध्यमातून आणि मुंबई व मुंबई उपनगराच्या दोन्ही जिल्हाधिकाऱ्यांचा समावेश असलेली एक विशेष समिती गठीत करण्यात आली असून, त्यांच्याद्वारे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे.

**तीन महिन्यांत होणार पुनर्वसनाचा मास्टर प्लॅन**

सभागृहात लोकप्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या सूचनेची दखल घेत शासनाने स्पष्ट केले की, पुढील तीन महिन्यांत सर्व संबंधित जमिनींवरील रहिवाशांचे बायोमॅट्रिक व प्रत्यक्ष सर्वेक्षण पूर्ण केले जाईल. ज्या जागांवर पर्यावरण किंवा तांत्रिक कारणांमुळे घरे नियमित करता येणार नाहीत, तिथल्या रहिवाशांना म्हाडा, सिडको किंवा एसआरएच्या गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये कुठे आणि कसे सामावून घेता येईल, याचा संपूर्ण आराखडा (मास्टर प्लॅन) यादरम्यान तयार केला जाईल.

१ जानेवारी २०११ पूर्वीच्या एकाही अधिकृत पात्र रहिवाशाला बेघर होऊ दिले जाणार नाही आणि सरकार त्यांच्या हक्काच्या घरासाठी पूर्णपणे कटिबद्ध आहे, असे ते म्हणाले.

**थोडक्यात**

## हॉस्टेलमध्ये विषारी साप, चौघींना दंश

**लोहादर्गा :** झारखंडमधील लोहादर्गा जिल्ह्यातून एक अत्यंत धक्कादायक आणि दुर्दैवी घटना समोर आली आहे. एका खासगी शाळेच्या मुलींच्या वसतिगृहात मध्यरात्री विषारी साप मण्यार घुसल्याने एकच खळबळ उडाली. या सापाने खोलीत झोपलेल्या विद्यार्थीनींना दंश केला. यामध्ये एका १३ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू झाला आहे. तर इतर तीन विद्यार्थिनींची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना रोचो महुआटोली येथील सानवासीरा हायर सेकेंडरी रेसिडेन्शियल स्कूलमध्ये घडली. मंगळवारी रात्री नेहमीप्रमाणे सर्व विद्यार्थिनी जेवण करून वसतिगृहातील आपल्या खोलीत झोपल्या होत्या. रात्री ११ वाजण्याच्या सुमारास एक अत्यंत विषारी मण्यार साप खोलीत घुसला. सापाने सर्वात आधी वर्षा उराव या १३ वर्षीय मुलीला दंश केला. सर्पदंश होताच वर्षा वेदनेने जोरात ओरडली, ज्यामुळे खोलीतील इतर मुलींना जाग आली. मात्र, काही समजण्याच्या आणि मुलींना तिथून पळ काढण्याच्या आतच संतापलेल्या सापाने जवळच झोपलेल्या अनिशा उराव, मनिषा कुमारी आणि फुलमानिया उराव या इतर तीन मुलींनाही दंश केला. मुलींचा आरडाओरडा ऐकून वसतिगृहाचे कर्मचारी तातडीने खोलीकडे धावले. त्यांनी चारही मुलींना तात्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल केले.

# हिंगोली, परभणी, नांदेडमध्ये मध्यरात्री भूकंपाचे सौम्य धक्के

**दोन तासात चार वेळा धरणीकंपाची पहिलीच वेळ**



**वृत्तसंस्था, हिंगोली**
हिंगोली, नांदेड, परभणी जिल्ह्यात गुरुवार, ९ जुलै रोजी मध्यरात्री भूकंपाचे एकामागून एक चार सौम्य धक्के जाणवले. मध्यरात्री १:३७, २:१५, २.१७ आणि ३.२३ वाजताचा भूकंपाचे धक्के जाणवल्याची माहिती जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास प्राप्त झाली. या भूकंपची तीव्रता रिष्टर स्केलवर अनुक्रमे ४.६, ३.६, ३.९ व ४.१ अशी नोंदवण्यात आलेली आहे.

भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील शिरळी या गावात असून सुदैवाने या धक्क्यामुळे कुठलीही जीवित किंवा वित्तहानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास प्राप्त झाली आहे.

भूकंपाचे धक्के बसले तेव्हा बहुतांश जण झोपेत होते. एकापाठोपाठ एक असे दोन धक्के जाणवले असल्यामुळे सकाळपर्यंत अजून धक्के बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच भूकंपाची पूर्वकल्पना देणे शक्य नसल्यामुळे नागरिकांनी घाबरुन न जाता सतर्क रहावे. भूकंपाचे धक्के जाणवताच घराबाहेर पडून मोकळ्या जागेत जमावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

हिंगोली- नांदेड- परभणी या भागात अनेक नागरिकांनी हा अनुभव घेतला. पहिला धक्का हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील पांग्रा शिंदे गावाच्या दक्षिणेकडे शिरळी या गावात याचे भूकंप केंद्र होते, यावेळेस भूकंप खोली १० किलोमीटर होती. तर दुसरे दोनही धक्के पांग्रा शिंदे गावाच्या पश्चिम- उत्तरेकडील काकडधाबा गावात यांचे केंद्र होते. यांची खोली १० किलोमीटर नोंदली गेली.

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ, कळमनुरी व वसमत तालुक्यात गेल्या सहा वर्षांत ३७ पेक्षा जास्त सौम्य भूकंपाच्या धक्क्यांची नोंद झाली आहे. आज मध्यरात्री ०१:३७ ते ०३:२३ या दोन तासांमध्ये चार सौम्य भूकंपाचे धक्के जाणवले. एकाच दिवशी चार धक्के बसण्याची ही पहिलीच वेळ आहे अशी माहिती ज्येष्ठ भूगर्भ शास्त्रज्ञ तथा छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. श्रीनिवासजी औंधकर यांनी दिली.

**नागरिकांनी भूकंपाबाबत अफवांवर विश्वास ठेवू नये : जिल्हाधिकारी**

हिंगोली जिल्ह्यात आज पहाटे भूकंपाचे धक्के जाणवले असून, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून प्राप्त झालेल्या प्राथमिक माहितीनुसार भूकंपाची तीव्रता ४.६ रिश्टर स्केल इतकी नोंदविण्यात आली आहे.

भूकंपाचा केंद्रबिंदू वसमत तालुका परिसरात असल्याची प्राथमिक माहिती आहे. या घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाल्याची माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवा पसरवू नयेत तसेच अफवांना बळी पडू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

# ऑस्ट्रेलिया करणार भारताला युरेनियमचा पुरवठा

**वृत्तसंस्था, मेलबर्न**
भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील युरेनियम करारावर शिक्कामोर्तब झाले आहे. मेलबर्नमध्ये पंतप्रधान मोदी आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी बैठकीनंतर संयुक्त पत्रकार परिषदेत संरक्षण, व्यापार, ऊर्जा, अवकाश आणि महत्त्वपूर्ण खनिजे (क्रिटिकल मिनरल्स) यासह अनेक क्षेत्रांतील करारांची घोषणा केली.

मोदी म्हणाले ऑस्ट्रेलियाकडून भारताला युरेनियम मिळाल्याने भारताच्या स्वच्छ ऊर्जा मिशनला बळकटी मिळेल. त्यांनी सांगितले की, भारत आणि ऑस्ट्रेलिया मिळून क्रिटिकल मिनरल्स कॉरिडॉर देखील विकसित करतील. कोकोस (कीलिंग) बेटावर स्पेस ट्रॅकिंग टर्मिनल तयार केले जाईल, ज्यामुळे भारताच्या गगनयान मिशनला मदत मिळेल. भारत सध्या ४ देशांकडून युरेनियम खरेदी करतो. ऑस्ट्रेलिया पाचवा देश आहे.

युरेनियम अणुऊर्जा आणि बॉम्ब दोन्हीसाठी आवश्यक आहे. भारत आणि ऑस्ट्रेलियाचे नाते क्रिकेटसारखे आहे. आमच्या भेटी क्रिकेटप्रमाणे होतात. कार्यसूचीमध्ये एकदिवसीय सामन्यासारखे लक्ष केंद्रित केले जाते, निर्णय टी-२० प्रमाणे वेगाने घेतले जातात आणि आमची भागीदारी कसोटी सामन्याप्रमाणे दीर्घकाळ टिकणारी आणि मजबूत आहे. मोदी म्हणाले भारत आणि ऑस्ट्रेलियाचे मत आहे की, दहशतवाद संपूर्ण मानवतेसाठी एक गंभीर आव्हान आहे. दहशतवादाविरुद्धची आमची लढाई सामायिक आहे आणि या क्षेत्रात दोन्ही देशांमधील सहकार्य सातत्याने मजबूत होत आहे.

**पूर्वी आमची धोरणे वेगळी : अँथनी अल्बानीज**

ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज म्हणाले आतापर्यंत दोन्ही देशांच्या पुरवठा साखळ्या जोडलेल्या होत्या, पण आमची धोरणे वेगवेगळी होती. आजचे हे पाऊल ती दरी मिटवण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. ते म्हणाले आज आम्ही २०१५ च्या भारत-ऑस्ट्रेलिया अणुसहकार्य करारांतर्गत भारताला युरेनियम निर्यातीच्या व्यवस्थेवर स्वाक्ष-या केल्या आहेत. आम्ही दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ करण्यासाठी सातत्याने काम करत आहोत.

**सेमीकंडक्टरवर एकत्र काम करणार**

दोन्ही देशांनी ऑस्ट्रेलिया-भारत सायबर, क्रिटिकल टेक्नॉलॉजी आणि सप्लाय चेन भागीदारी सुरू करण्यास सहमती दर्शवली आहे. या अंतर्गत दोन्ही देश आर्टिफिशियल इंटेलिजन्स, क्वांटम कंप्यूटिंग, सेमीकंडक्टर, सायबर सुरक्षा आणि डिजिटल रेझिलियन्स यांसारख्या क्षेत्रांमध्ये एकत्र संशोधन करतील.




# निवृत्त आरटीओच्या घरात सापडले घबाड

**वृत्तसंस्था, लखनौ**
उत्तर प्रदेशात प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यावर उत्पन्नापेक्षा जास्त मालमत्ता बाळगल्या प्रकरणी कारवाई करण्यात आली. न्यायालयाने झडतीचे वॉरंट काढल्यानंतर अधिकाऱ्यांनी त्याच्या लखनौतील निवासस्थानी छापे टाकले असता मोठे घबाड सापडले आहे. रोकड, सोने चांदीसह मालमत्तांची कागदपत्रे आढळून आली आहेत.

ललित कुमार असे कारवाई करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव आहे. लखनौतील अलीगंजमधील त्याच्या निवासस्थानी छापा टाकल्यानंतर अधिकाऱ्यांचेही डोळे विस्फारले. घरात तब्बल १.६२ कोटींची रोकड सापडली आहे. घरात वेगवेगळ्या ठिकाणी पाकिटांमध्ये हे पैसे ठेवले होते. अजुनही कारवाई सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. विजिलन्स विभागानं टाकलेल्या छाप्यात घरात काही मौल्यवान वस्तूही सापडल्या आहेत. सोन्याच्या १३ किलोच्या वस्तू अधिकाऱ्याकडे सापडल्या. यात साखळ्या, विटा आणि दागिने यांचा समावेश आहे. तर चांदीच्या ९ किलोच्या साखळ्या, बिस्किटे आणि दागिने आढळून आले. याची एकत्रित किंमत जवळपास २० कोटी रुपये अंदाजे आहे.

ललित कुमारच्या घरात अनेक कागदपत्रेही आढळली आहेत. यात लखनौत अनेक ठिकाणी फ्लॅट आणि प्लॉट आहेत. याशिवाय लखनौ, बाराबंकी, रायबरेली जिल्ह्यात शेजतमीन आणि लखनौ, नोएडात फ्लॅट बूकिंग यांचा समावेश आहे. या जमिनींची आणि फ्लॅटची एकत्रित किंमत १२३ कोटी सांगितली जात आहे. अधिकाऱ्यांनी घरातून टोयोटा, इनोव्हा,हुंडाई आय २० कार आणि एक रिव्हॉल्वर जप्त करण्यात आली.

# अमेरिकेचा इराणच्या ९० ठिकाणांवर हल्ला



**वृत्तसंस्था, तेल अवीव**
इराणने कतार, कुवेत आणि बहरीनमधील अमेरिकन लष्करी तळांवर ड्रोन हल्ले केले आहेत. इराणी सैन्यानुसार, या हल्ल्यांमध्ये कुवेतच्या पॅट्रियट क्षेपणास्त्र प्रणालीला, कतारच्या अर्ली वॉर्निंग सॅटेलाइट अँटेनाला आणि बहरीनमधील अमेरिकन सैन्याच्या इंधन टाकीला लक्ष्य करण्यात आले. या हल्ल्यांसाठी मोठ्या संख्येने ड्रोनचा वापर करण्यात आला.

यापूर्वी अमेरिकेने इराणवर सलग दुसऱ्या दिवशी मोठ्या प्रमाणावर हवाई हल्ले केले. अमेरिकन सेंट्रल कमांडने सुमारे ९० लष्करी तळांना लक्ष्य केल्याचा दावा केला. या हल्ल्यांमुळे इराणच्या अहवाजमध्ये ३ लोकांचा मृत्यू झाला आहे. इराणी सैन्याने सांगितले की, ते अमेरिकन हल्ल्यांना प्रत्युत्तर देत राहील. दुसरीकडे, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दावा केला की, इराणला करार हवा आहे, परंतु तेहरान कराराचे पालन करेल यावर त्यांना विश्वास नाही.

**काय घडले २४ तासांत?**

इराणच्या ९० ठिकाणांवर हल्ले अमेरिकन सैन्याने मंगळवारी रात्री उशिरा इराणच्या ९० हून अधिक लष्करी ठिकाणांवर हवाई हल्ले केले. अमेरिकेने सांगितले की, इराणच्या होर्मुजमधील जहाजांवरील हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून हे करण्यात आले आहे.

इराणसोबतची शस्त्रसंधी संपली अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नाटो परिषदेदरम्यान सांगितले की, इराणसोबत झालेला शस्त्रसंधी करार आता संपुष्टात आला आहे आणि आता त्यांना इराणसोबत कोणताही करार करायचा नाही.

**बहरीन आणि कुवेतमध्ये ८५ ठिकाणांना लक्ष्य**

इराणच्या रिव्होल्यूशनरी गार्ड्सने दावा केला की, त्यांनी बहरीन आणि कुवेतमध्ये ८५ अमेरिकन लष्करी ठिकाणांना क्षेपणास्त्रे आणि ड्रोनने लक्ष्य केले. यात अमेरिकेचे फिफ्थ फ्लीट मुख्यालय आणि अली अल-सलेम एअर बेसचाही समावेश असल्याचे सांगण्यात आले.

**अमेरिकेशी पुढील चर्चा होणार नाही**

इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची म्हणाले की, धमक्यांच्या वातावरणात अमेरिकेशी कोणतीही चर्चा किंवा करार होणार नाही, आधी अमेरिकेला जुन्या करारांचा सन्मान करावा लागेल.

**भारतीय ध्वजांकित जहाज परतले**

सीएनएननुसार, होर्मुझमधील वाढत्या तणावानंतर कुवेतचे २० लाख बॅरल कच्चे तेल घेऊन जाणारे भारतीय ध्वजांकित टँकर लीला वादिनार बुधवारी होर्मुझ स्ट्रेटजवळ ओमानच्या किनाऱ्यावरून परतले.

संपादकीय लेखणीतून...

# विकासाचे 'बारा'

देशाची आर्थिक राजधानी मुंबईत पावसाने आठवडाभरापासून हाहाकार माजवला. नेहमीप्रमाणे मुंबईची तुंबई होऊन जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले. मुंबईसह राज्याच्या अनेक भागात पावसाने थैमान घातले. रेल्वे, बससेवा, रस्ते या दळणवळणाच्या सुविधांवर परिणाम झाला. महापालिकेतील सत्ताधाऱ्यांनी मुंबईतील सर्व पावसाळी कामे पूर्ण झाल्याचा दावा केला होता. महापौरांनी भेटी दिल्याचे दाखवले गेले. पण पहिल्याच पावसात मुंबई महानगरपालिकेचे पितळ उघडे पडले. मान्सूनपूर्व नियोजनबद्ध तयारी न केल्याचा परिणाम जनतेला भोगावा लागला. पावसामुळे मनाला वेदना व्हाव्यात अशा अनेक घटना घडल्या. पहिल्याच पावसात सुमारे १४ लोकांचे जीव गेले. काही जणांना झाड कोसळून, भिंत पडून, मॅनहोलमध्ये पडून जीव गमवावा लागला. हे सारे केवळ अपघात नाहीत, तर प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे द्योतक आहेत. यंदा झाडे कोसळण्याच्या अनेक घटना घडल्या. गत चार वर्षे मुंबई महापालिकेवर प्रशासकीय राजवट होती, पण भाजपवाले ठाकरेंच्या शिवसेनेवर आरोप करण्यात मश्गुल आहेत. २५ वर्षांचा हिशेब काढू, अशी धमकीही देण्यात आली. पण त्या सत्तेत आपणही सहभागी होतो याचा सोयिस्करपणे विसर भाजपवाल्यांना पडला. मुंबईत जशा घटना घडल्या तशा राज्याच्या अन्य भागातही घडल्या. पूर येणे, दरड कोसळणे अशा घटनांमुळे रस्ते, महामार्ग बंद झाले.

मोठा गाजावाजा करत बांधण्यात आलेला मुंबई-पुणे मिसिंग लिंक पहिल्याच पावसात मिसिंग झाला. सुमारे ७ हजार कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या मिसिंग लिंकच्या निकृष्ट बांधकामाचे दर्शन अवघ्या दोन महिन्यांतच झाले. आधी गळती, खड्डे आणि आता दरड कोसळल्याने मिसिंग लिंक बंद ठेवण्याची वेळ आली. या प्रकल्पाच्या कामाच्या गुणवत्तेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकल्पात जो हजारो कोटी रुपयांचा चुराडा झाला तो पैसा जनतेचा होता. मुंबईत मुसळधार पावसामुळे झाडे कोसळण्याच्या सर्वाधिक घटना घडल्या. या केवळ नशिबाचा भाग म्हणता येणार नाहीत. अशा घटना का घडल्या याच्या मुळाशी जावे लागेल. झाडांची नियमित पाहणी करणे, धोकादायक झाडांची छाटणी करणे, वेळेत आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, यात मनपा एनविभागाच्या उद्यान विभागाकडून अक्षम्य हलगर्जीपणा झाला का ते सर्वप्रथम तपासले पाहिजे. दरवर्षी पावसाळ्यात अशा घटना घडत असतात हे माहीत असताना दुर्घटना घडल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा, पावसाळ्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देणे आवश्यक असते. नागरिकांच्या जीविताची सुरक्षा ही पालिका प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. नागरी सेवा-सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका व शासनातर्फे कंत्राटदारांची नेमणूक करण्यात येते.

शासकीय, निमशासकीय संस्थांमध्ये लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या विकासकामांना शासकीय व प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर कंत्राटदाराला हे काम दिले जाते. हे काम मिळवण्यासाठी कंत्राटदारांमध्ये मोठी स्पर्धा असते आणि नियमानुसार सर्वांत कमी दराची निविदा (टेंडर)असलेल्या कंत्राटदाराची निवड केली जाते. कंत्राटदारीतील भ्रष्टाचाराचे नेहमीच चर्वितचर्वण होत असते. परंतु त्यांच्या व्यथा समजून घेतल्या जात नाहीत. कंत्राटदारांना कंत्राट मिळवण्यासाठी निविदा रकमेतील ६५ टक्के रक्कम प्रशासकीय व लोकप्रतिनिधी स्तरावर लाच म्हणून द्यावी लागते म्हणे! उर्वरित ३५ टक्के रकमेतच त्यांना प्रत्यक्ष काम, मंजुरीचा खर्च आणि स्वतःचा नफा यांची सांगड घालावी लागते. १२ वर्षांपूर्वी, देशात सत्ताबदल होण्यापूर्वी सांगण्यात आले होते की, ना खाऊंगा, ना खाने दूंगा परंतु प्रत्यक्षात मात्र उलटेच घडले. भ्रष्टाचार निर्मूलन राहिले बाजूला उलट भ्रष्टाचार अधिकच बोकाळला. भ्रष्टाचार प्रचंड वाढल्याने विकासकामांचा दर्जा अत्यंत सुमार झाला. नवीन बनवलेले रस्ते पहिल्याच पावसात आपले अंतरंग उघडून दाखवू लागले, शहरात कचऱ्याचे ढीग वाढू लागले. पर्यायाने अस्वच्छतेमुळे पर्यावरण व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले. मुसळधार पावसात मोठे वृक्ष उन्मळून पडणे, गटारे गाळाने तुंबल्यामुळे रस्त्यावर पाणी तुंबून राहणे, रस्त्यावरील मॅनहोलची झाकणे गायब असल्यामुळे त्यात पडून नागरिकांचे प्राण जाणे हे प्रकार नित्याचे झाले आहेत.

मुंबईत महानगरपालिकेचा कारभार आणि मुख्यमंत्र्यांचे दावे फोल ठरले आहेत. पावसाळ्यापूर्वीचे नालेसफाईचे दावे पूर्णपणे फोल ठरले आहेत. मोठ्या प्रमाणावर साचलेल्या पाण्याचा वेळेत निचरा करण्यासाठी महापालिकेने कुठेही पाण्याचे पंप प्रभावीपणे वापरल्याचे दिसले नाही. पावसाळ्यापूर्वी मुख्यमंत्र्यांनी मोठ्या वल्गना केल्या होत्या की, पावसामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यासाठी शासन पूर्णपणे सज्ज आहे आणि आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत. प्रत्यक्षात काय? सारा अनागोंदी कारभार पाहता मुख्यमंत्री आपल्या दाव्यांवर अक्षरशः तोंडावर आपटले आहेत. हजारो रुपये खर्चून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर बांधण्यात आलेल्या मिसिंग लिंक प्रकल्पाचे मोठ्या गाजावाजात उद्घाटन करण्यात आले. हा प्रकल्प महाराष्ट्राच्या विकासाचा मैलाचा दगड असल्याचे चित्र निर्माण करण्यात आले. मात्र, पहिल्याच पावसात प्रवेशद्वाराजवळ दरड कोसळणे, पाण्याचा प्रचंड मारा होणे आणि वाहतूक बंद करण्याची वेळ येणे, अशा घटनांनी प्रकल्पाच्या गुणवत्तेवर आणि सुरक्षिततेवर गंभीर प्रश्न उभे केले आहेत.

# 'डीएनए भारतीय, ': प्रबोवो सुबियांतो यांच्या वक्तव्याने भारत-इंडोनेशिया मैत्रीला नवी ऊर्जा

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांनी नुकत्याच केलेल्या एका विधानामुळे भारत आणि इंडोनेशियाच्या मैत्रीला नवीन ऊर्जा मिळाली आहे. जकार्ता येथे भारतीय समुदायाशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की, नुकत्याच झालेल्या जीनोम सिक्वेन्सिंग चाचणीत त्यांना भारतीय डीएनए असल्याचे आढळले आहे. इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांनी जकार्ता येथील एका कार्यक्रमात सांगितले की, डीएनए चाचणीत त्यांच्यात 'भारतीय डीएनए' असल्याचे निष्पन्न झाले आहे.यासोबतच त्यांनी मिश्कीलपणे जोडले की, त्यांचे बहुतांश मंत्री भारतीय गाणी खूप छान गातात आणि कदाचित त्यांच्यामध्येही भारतीय डीएनए असावा.

अध्यक्ष प्रबोवो यांनी उघड केले की त्यांनी भारताच्या दौऱ्यावर जाण्यापूर्वी स्वतःची जीनोम सिक्वेन्सिंग चाचणी केली होती. या चाचणीत त्यांना त्यांच्यामध्ये भारतीय वंशाचे अंश असल्याचे समजले. त्यांनी सांगितले की जेव्हा ते भारतीय संगीत ऐकतात, तेव्हा त्यांचे शरीर नकळत थिरकू लागते.

"अनेक शतकांपासून आपल्या दोन्ही देशांमध्ये सांस्कृतिक आणि भावनिक नाते आहे. आज मी अभिमानाने सांगू शकतो की, माझा डीएनए देखील भारतीय आहे," असे अत्यंत कौतुकास्पद आणि भावनिक उद्गार इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांनी काढले आहेत. जकार्ता येथे आयोजित एका विशेष कार्यक्रमात अनिवासी भारतीयांना संबोधित करताना त्यांनी भारतासोबतच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संबंधांना उजाळा दिला.

सुबियांतो यांनी आपल्या भाषणात अधोरेखित केले की, इंडोनेशियाच्या संस्कृतीवर आणि भाषेवर भारतीय संस्कृतीचा खोल प्रभाव आहे. इंडोनेशियाच्या भाषेतील जवळपास ५०% शब्द संस्कृत भाषेतून आले आहेत आणि अनेक लोकांची नावे देखील संस्कृत आहेत. सध्या त्यांच्या या अनोख्या विधानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.

अध्यक्ष सुबियांतो यांनी केवळ आपल्या भारतीय जोडलेल्या नात्याचाच उल्लेख केला नाही, तर त्यांच्या मंत्रिमंडळातील सदस्यांना भारतीय संस्कृतीची आणि संगीताची किती आवड आहे, यावरही मिश्कील भाष्य केले. ते म्हणाले, "माझ्या मंत्रिमंडळातील अनेक मंत्री भारतीय गाणी अतिशय सुंदर आणि सुश्राव्य पद्धतीने गातात. आमच्यावर भारतीय संस्कृतीचा खूप मोठा प्रभाव आहे." त्यांच्या या विधानानंतर सभागृहात उपस्थित असलेल्या भारतवंशियांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले.

इंडोनेशिया आणि भारत यांच्यातील संबंध आजचे नसून शतकानुशतके जुने आहेत. दोन्ही देशांत सांस्कृतिक अन् ऐतिहासिक धागा जोडला गेला आहे. रामायण, महाभारत या महाकाव्यांचा इंडोनेशियाच्या संस्कृतीवर, तेथील कलाप्रकारांवर आणि जीवनशैलीवर खोल प्रभाव आहे. याच पार्श्वभूमीवर बोलताना अध्यक्षांनी, भारत आणि इंडोनेशिया हे केवळ दोन देश नसून एकाच सांस्कृतिक वारशाचे दोन महत्त्वाचे स्तंभ असल्याचे अधोरेखित केले.

सोशल मीडियावर हा व्हिडिओ सध्या चांगलाच प्रसिद्धीस आला आहे ट्विटर ( ), इंस्टाग्राम आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर #PrabowoSubianto आणि #IndonesiaPresident या हॅशटॅगसह मोठ्या प्रमाणात शेअर केला जात आहे.

त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अनेक योजनांचा अभ्यास केला असून, भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही कशी चालवतो, यातून इंडोनेशिया खूप काही शिकत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दोन्ही देशांमधील राजनैतिक आणि आर्थिक संबंधांना या नव्या विधानामुळे आणि आपुलकीमुळे एक नवी दिशा मिळेल, असा विश्वास राजकीय विश्लेषकांकडून व्यक्त केला जात आहे. जागतिक पातळीवर भारताचे वाढते महत्त्व आणि आशियाई देशांसोबतचे दृढ होत जाणारे संबंध याचे प्रतीक म्हणून या भाषणाकडे पाहिले जात आहे. नेटिझन्सकडून प्रबोवो सुबियांतो यांच्या या मनमोकळ्या आणि आपुलकीच्या वक्तव्याचे भरभरून कौतुक होत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी इंडोनेशियाच्या महत्त्वपूर्ण दोन दिवसीय दौऱ्यासाठी जकार्ता येथे आहेत. भारताच्या प्रमुख निवडणूक सुधारणेला जागतिक मान्यता आणि मागणी मिळण्याच्या पार्श्वभूमीवर निवडणुकीत वापरल्या जाणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या (ईव्हीएम), भारतीय ईव्हीएम मॉडेलची प्रतिकृती तयार करण्यास उत्सुक असलेला नवीनतम देश इंडोनेशिया आहे. जवळपास २८८ दशलक्ष लोकसंख्या असलेला आणि जगातील तिसरा सर्वात मोठा लोकशाही देश असलेला इंडोनेशिया, आपल्या निवडणूक प्रणालीचे आधुनिकीकरण करण्यासाठी निवडणूक तंत्रज्ञान, व्यवस्थापन कौशल्य आणि संस्थात्मक पाठिंब्यासाठी भारताकडे वळत आहे.

भारत आणि इंडोनेशिया यांच्यातील करारामुळे निवडणूक तंत्रज्ञान, मनुष्यबळ विकास, क्षमता बांधणी आणि सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण या क्षेत्रांमध्ये सहकार्याला चालना मिळेल, असे सूत्रांनी सांगितले. यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा दोन दिवसीय जकार्ताचा दौरा महत्वाचा आहे.

- ९५६१५९४३०६

# उंबरठा चाळीशीचा..

डॉ. राजेंद्र टेकाडे
काटोल, जि. नागपूर

चाळीशी हा आयुष्यातला एक वेगळाच टप्पा आहे. या वयापर्यंत स्त्री असो वा पुरुष, दोघांनीही आई-वडील, मुलं, त्यांचं शिक्षण-करिअर, संसार, जोडीदाराचं करिअर या सगळ्यांची जबाबदारी आनंदाने पेललेली असते. पण या धावपळीत बरेचदा माणूस स्वतःला विसरून जातो. स्वतःच्या आवडी-निवडी, मन मोकळं करायची जागा, स्वतःसाठी वेळ या गोष्टी मागे पडलेल्या असतात. अशा वेळी चाळीशीनंतर जोडलेली खरी, विश्वासार्ह मैत्री ही केवळ भावनिक आधार नाही तर मानसिक आणि वैज्ञानिक दृष्ट्याही स्त्री-पुरुष दोघांसाठीही

अत्यंत महत्त्वाची ठरते. हा उंबरठा ओलांडताना स्वतःसाठी घेतलेला हा निर्णय पुढच्या संपूर्ण आयुष्याची दिशा ठरवू शकतो.

हे केवळ स्त्रीपुरतं किंवा केवळ पुरुषापुरतं मर्यादित नाही. वयाच्या चाळिशीनंतर पुरुषालाही तितकीच गरज असते मन मोकळं करणाऱ्या, समजून घेणाऱ्या मैत्रिणीची जशी स्त्रीला विश्वासू मित्राची गरज असते. करिअर, कुटुंबाची जबाबदारी, आर्थिक ताण यात गुंतलेला पुरुषही आपल्या भावना अनेकदा व्यक्त करू शकत नाही. समाज त्याला "कणखर" राहण्याची अपेक्षा ठेवतो. अशा वेळी एखादी समजूतदार मैत्रीण किंवा मित्र त्याला मोकळेपणाने बोलण्याची, ऐकून घेतलं जाण्याची जागा देतो. म्हणजे मैत्री ही केवळ एका बाजूची गरज नसून,स्त्री आणि पुरुष दोघांनाही संवाद साधण्यासाठी, मन हलकं करण्यासाठी आणि स्वतःला पुन्हा ओळखण्यासाठी समान भावनिक आधाराची गरज असते.

घट्ट सामाजिक नाती असलेल्या व्यक्तींमध्ये मग त्या स्त्री असोत किंवा पुरुष तणाव संप्रेरक कॉर्टिसोलची पातळी कमी असते. मित्र-मैत्रिणीशी मनातलं बोलणं, हसणं-खिदळणं, एकमेकांचे अनुभव शेअर करणं यामुळे मन हलकं होतं आणि रोजच्या ताणतणावाचा शरीरावर होणारा परिणाम कमी होतो. हे केवळ "बरं वाटणं" नाही, तर शरीरातील जैवरासायनिक बदल आहे, जो दीर्घकालीन आरोग्यासाठी फायदेशीर ठरतो. नियमितपणे मित्र-मैत्रिणींसोबत वेळ घालवणाऱ्या व्यक्तींमध्ये रक्तदाब आणि हृदयाशी संबंधित तक्रारीही तुलनेने कमी आढळतात, असं अनेक आरोग्य अभ्यासांतून समोर आलं आहे. रोगप्रतिकार शक्तीवरही सामाजिक नात्यांचा सकारात्मक परिणाम होतो, असं काही संशोधनांत नमूद केलं आहे. म्हणजे मैत्री ही स्त्री-पुरुष दोघांसाठीही सारखीच केवळ मानसिक नाही तर शारीरिक आरोग्याचीही ढाल बनते.

चाळीशीत अनेकदा माणसाला स्वतःच्या ओळखीचा प्रश्न पडतो "आत्तापर्यंत मी सगळ्यांसाठी जगलो, आता मी कोण?" अशा वेळी मित्र-मैत्रीण त्याला/तिला स्वीकारते, ऐकते, प्रोत्साहन देते. यातून आत्मसन्मान आणि स्व-ओळख अधिक भक्कम होते. मैत्रीमधून मिळणारा हा भावनिक आधार पुन्हा स्वतःवर विश्वास ठेवायला शिकवतो. जुने मित्र-मैत्रिणी असोत किंवा नव्याने जोडलेले, त्यांच्याशी बोलताना जाणवतं की आपलं अस्तित्व फक्त "आई-वडील", "पती-पत्नी" या भूमिकांपुरतं मर्यादित नाही, तर आपलं स्वतःचं एक वेगळं व्यक्तिमत्त्व आहे.

भावना व्यक्त करणं हे मानसिक आरोग्यासाठी अत्यावश्यक आहे. अनेकजण राग, दुःख, भीती किंवा असमाधान मनातच दाबून ठेवतात. कारण त्यांना वाटतं घरातल्यांना त्रास होईल. विशेषतः पुरुषांना लहानपणापासून "रडू नकोस", "कणखर रहा" असं शिकवलं जातं, त्यामुळे त्यांच्यासाठी भावना व्यक्त करण्याची जागा मिळणं तितकंच गरजेचं असतं. विश्वासू मित्र-मैत्रिणीसमोर मन मोकळं केल्याने या भावनांवर प्रक्रिया होते आणि वर्तनात एक प्रकारची स्थिरता येते. मानसशास्त्रात याला "इमोशनल रेग्युलेशन" म्हणतात म्हणजे भावनांवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता. जेव्हा भावना दाबल्या जातात तेव्हा त्या शारीरिक तक्रारींच्या रूपात बाहेर येऊ शकतात; मात्र योग्य व्यक्तीशी संवाद साधल्यास हा धोका बऱ्याच अंशी कमी होतो.

याशिवाय, सामाजिक संवाद हा मेंदूसाठीही व्यायामासारखा असतो. संभाषण, चर्चा, नवीन विचारांची देवाणघेवाण यामुळे मेंदू सक्रिय राहतो. सामाजिकदृष्ट्या सक्रिय राहणाऱ्या व्यक्तींमध्ये स्मरणशक्ती कमी होण्याचं आणि अल्झायमरसारख्या आजारांचं प्रमाण तुलनेने कमी आढळतं. म्हणजे मैत्री ही केवळ मनाची नाही तर मेंदूचीही गरज आहे. वयाच्या चाळिशीनंतर मेंदूला सतत नवीन उत्तेजना मिळणं गरजेचं असतं आणि विविध विचारसरणीच्या मित्र-मैत्रिणींशी होणारा संवाद हे काम सहज साध्य करतो.

एकटेपणा आणि नैराश्य हे मध्यमवयात अनेकदा शांतपणे शिरतात. मुलं मोठी होऊन स्वतःच्या विश्वात रमतात, जोडीदार कामात व्यस्त असतो अशा वेळी स्त्री-पुरुष दोघांनाही एकटं वाटू शकतं. पण ज्याच्याकडे घट्ट मैत्रीचं वर्तुळ आहे, त्याला हा एकटेपणा तितकासा जाणवत नाही. मजबूत सामाजिक नाती असलेल्या मध्यमवयीन व वृद्ध व्यक्तींमध्ये उदासीनतेचा धोका लक्षणीयरीत्या कमी असतो. "एम्प्टी नेस्ट सिंड्रोम" सारख्या टप्प्यातून जाताना मित्र-मैत्रिणींचा आधार हा एक प्रकारचा भावनिक कवच ठरतो.

मैत्रीमुळे आरोग्यदायी सवयीही सहज अंगी बाणतात. एकत्र फिरायला जाणे, योगासने करणे, आहारावर चर्चा करणे, वेळेवर वैद्यकीय तपासणी करणे या गोष्टी एकट्याने करणं कठीण वाटतं पण मित्र-मैत्रिणीच्या साथीने त्या सोप्या आणि आनंददायी होतात. एकत्र चालायला जाणं किंवा एखादा नवा व्यायामप्रकार शिकणं, यातून केवळ शरीरच नाही तर नातंही अधिक घट्ट होतं.

चाळीशीनंतर आयुष्याला एक नवा अर्थ, नवं ध्येय शोधण्याची गरज भासते.मित्र-मैत्रिणींसोबत शेअर केलेले छंद, प्रवास, एखादा नवा कोर्स किंवा सामाजिक कार्य यातून आयुष्याला पुन्हा उद्देश मिळतो. हा अनुभव मानसिक समाधान आणि सकारात्मकता वाढवतो. काहीजण या वयात नवीन कला शिकतात, काहीजण सामाजिक उपक्रमांत सहभागी होतात आणि हे सगळं करताना सोबतीला असलेली मैत्री हा प्रवास अधिक अर्थपूर्ण बनवते.

वेगवेगळ्या मित्र-मैत्रिणींचे वेगवेगळे दृष्टिकोन ऐकल्याने निर्णयक्षमता सुधारते. एखादा प्रश्न किंवा समस्या असेल, तर त्यांच्याशी चर्चा केल्याने अनेक बाजूंनी विचार करता येतो आणि योग्य निर्णय घेणं सोपं होतं. एकट्याने विचार करताना जे कोडं सुटत नाही, ते संवादातून सहज उलगडतं. आयुष्यातले मोठे निर्णय मग ते करिअरबद्दल असोत, कुटुंबाबद्दल असोत किंवा स्वतःच्या आरोग्याबद्दल असे निर्णय एकट्याने घेण्यापेक्षा विश्वासू व्यक्तीशी चर्चा करून घेतल्यास ते अधिक संतुलित ठरतात.

सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, आधार देणाऱ्या मैत्रीमुळे स्त्री-पुरुष दोघेही स्वतःच्या मयार्दा ओळखायला आणि गरज पडल्यास "नाही" म्हणायला शिकतात. पारंपरिक भूमिकांमध्ये अडकलेल्या प्रत्येकासाठी ही स्व-सीमा ओळखणं खूप महत्त्वाची आहे कारण त्यातूनच स्वतःसाठी थोडी जागा तयार करता येते. मैत्रीचा पाठिंबा असला की हे "नाही" म्हणणं अपराधीपणाशिवाय शक्य होतं.

मैत्रीमुळे हसण्याचं आणि आनंद साजरा करण्याचं प्रमाणही वाढतं. हसण्यामुळे शरीरात एंडोर्फिन्स नावाचं सुखद संप्रेरक तयार होतं, जे वेदना कमी करतं आणि मूड सुधारतं. रोजच्या धकाधकीच्या आयुष्यात मित्र-मैत्रिणींसोबत घालवलेले हलकेफुलके क्षण गप्पा, चहा, एकत्र सिनेमा बघणं हे छोटे छोटे आनंद मानसिक स्वास्थ्यासाठी तितकेच मोलाचे असतात. जितके मोठे यशस्वी क्षण मग ते स्त्रीचे असोत वा पुरुषाचे त्यांच्या आनंद व सुखात वाढ करते. मैत्री माणसाला नवीन आव्हानं स्वीकारण्याचं धाडस देते. नवीन छंद, प्रवास, शिक्षण किंवा करिअरमधला बदल या सगळ्या गोष्टी करण्याचं बळ मित्र-मैत्रिणींच्या पाठिंब्यातून मिळतं. यातून मानसिक लवचिकता वाढते, जी आयुष्यातल्या पुढच्या टप्प्यांसाठी खूप उपयोगी ठरते. आयुष्यात येणारे चढ-उतार पेलण्याची ताकद ही अशा नात्यांमधूनच मिळते.

चाळीशीचा उंबरठा ओलांडताना स्त्री असो वा पुरुष, प्रत्येकाने स्वतःसाठी मैत्रीचं वर्तुळ जपणं ही चैन नाही तर गरज आहे. ही मैत्री दोघांनाही भावनिक आधार देते, मानसिक आरोग्य टिकवते आणि वैज्ञानिक दृष्ट्याही शारीरिक व मानसिक स्वास्थ्य सुधारते. म्हणूनच, चाळीशीनंतर स्वतःसाठी वेळ काढून खरे मित्र-मैत्रिणी जोडणं, त्या नात्याला जपणं हा स्वतःवरचा सर्वांत सुंदर गुंतवणुकीचा निर्णय ठरतो. या उंबरठ्यावर उभं राहून मागे वळून बघितलं, तर लक्षात येतं की स्वतःसाठी जपलेली प्रत्येक मैत्री ही खऱ्या अर्थाने आयुष्य समृद्ध करणारी गुंतवणूक असते.

- ९१४५७७९०५०

# वेस्ट इंडिज क्रिकेट व डब्ल्यूटीसी एक उहापोह

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

वेस्ट इंडिजचे माजी वेगवान गोलंदाज कोर्टनी वॉल्श यांची झिम्बाब्वेच्या वरिष्ठ पुरुष क्रिकेट संघाच्या गोलंदाजी प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. झिम्बाब्वे क्रिकेटने बुधवारी ही घोषणा केली. झिम्बाब्वे क्रिकेटने सांगितले की, ब्लेसिंग न्गोंडो यांच्या अध्यक्षतेखालील क्रिकेट समितीने, मुख्य प्रशिक्षक जस्टिन सॅमन्स यांच्या नेतृत्वाखालील वरिष्ठ पुरुष संघाच्या सहाय्यक कर्मचाऱ्यांना कायम ठेवण्याची शिफारस केली आहे.

झिम्बाब्वे क्रिकेटचे अध्यक्ष तावेंग्वा मुकुहलानी म्हणाले, "आमचा विश्वास आहे की त्यांच्याकडे अनुभव, कौशल्य, सातत्य आणि एक नवीन दृष्टिकोन यांचा एक मजबूत मिलाफ आहे, जो आमच्या राष्ट्रीय संघांमधील आणि खेळाडूंच्या प्रगतीच्या मार्गावरील धोरणात्मक उद्दिष्टे साध्य करण्यास मदत करेल." कोर्टनी वॉल्श बऱ्याच काळापासून प्रशिक्षणात सक्रियपणे सहभागी आहेत. त्यांनी अलीकडेच भारत आणि श्रीलंका यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत झिम्बाब्वेचे गोलंदाजी सल्लागार म्हणून काम पाहिले. झिम्बाब्वेने 'गट ब' मध्ये अव्वल स्थान मिळवून सुपर ८ मध्ये प्रवेश केला. वॉल्श यांच्या नेतृत्वाखाली झिम्बाब्वेच्या गोलंदाजीत लक्षणीय बदल झाला आहे. याच कारणामुळे, त्यांना सल्लागाराऐवजी पूर्णवेळ प्रशिक्षकाची जबाबदारी देण्यात आली आहे.

**वॉल्श, त्यांच्या काळातील एक महान गोलंदाज**

वॉल्श यांनी सप्टेंबर २०१६ पासून तीन वर्षांच्या करारावर बांगलादेशचे गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून काम पाहिले आहे. चंडिका हथुरुसिंगा यांच्या राजीनाम्यानंतर फेब्रुवारी २०१८ मध्ये त्यांची अंतरिम मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली. ऑक्टोबर २०२० मध्ये, त्यांची वेस्ट इंडिज महिला संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती झाली, परंतु २०२३ च्या टी२० विश्वचषकानंतर त्यांचा करार वाढवण्यात आला नाही. कोर्टनी वॉल्श यांना क्रिकेट इतिहासातील महान वेगवान गोलंदाजांपैकी एक मानले जाते. वॉल्श यांनी १९८४ ते २००१ दरम्यान १३२ कसोटी सामन्यांमध्ये ५१९ बळी घेतले आणि कसोटी क्रिकेटमध्ये ५०० बळी घेणारे ते पहिले गोलंदाज ठरले. वॉल्श यांच्या नावावर २०५ एकदिवसीय सामन्यांमध्ये २२७ बळी देखील आहेत.

तर डब्ल्यूटीसी २०२५ - २७ च्या चक्रात अँटिग्वा येथे श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यादरम्यान षटकांचा वेग कमी ठेवल्याबद्दल वेस्ट इंडिज क्रिकेट संघाला त्यांच्या सामना शुल्काच्या १० टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. तसेच, संघाचे दोन महत्त्वाचे आयसीसी जागतिक कसोटी चॅम्पियनशिप ( डब्ल्यूटीसी) गुणही कमी करण्यात आले आहेत. निर्धारित वेळेचा विचार करूनही वेस्ट इंडिज संघ लक्ष्यापेक्षा दोन षटके कमी पडल्याने, आयसीसी एलिट पॅनेलचे सामनाधिकारी जवागल श्रीनाथ यांनी हा निर्णय घेतला. खेळाडू आणि खेळाडूंच्या सहाय्यक कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या आयसीसी आचारसंहितेच्या कलम २.२२ नुसार, जर एखादा संघ निर्धारित वेळेत आपली पूर्ण षटके टाकण्यात अयशस्वी ठरला, तर कमी पडलेल्या प्रत्येक षटकासाठी खेळाडूंना त्यांच्या सामना शुल्काच्या पाच टक्के दंड आकारला जातो. या नियमांतर्गत कमाल दंड सामना शुल्काच्या ५० टक्क्यांपर्यंत असू शकतो. वेस्ट इंडिज संघ दोन षटके कमी पडल्याने, संघाला त्यांच्या सामना शुल्काच्या एकूण १० टक्के दंड आकारण्यात आला.

**वेस्ट इंडिज आठव्या स्थानावर**

याव्यतिरिक्त, आयसीसी जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या खेळाच्या अटींच्या कलम १६.११.२ नुसार, प्रत्येक कमी षटकासाठी एक डब्ल्यूटीसी गुण वजा केला जातो. या नियमानुसार, वेस्ट इंडिजचे दोन गुण वजा करण्यात आले. या कपातीनंतर, संघाचे टक्केवारी गुण (पीसीटी) १५ पर्यंत खाली आले आहेत. वेस्ट इंडिज सध्या डब्ल्यूटीसी क्रमवारीत आठव्या स्थानावर आहे.

**रॉस्टन चेसने आरोप मान्य केले**

वेस्ट इंडिजचा कर्णधार रॉस्टन चेसने त्याच्यावरील आरोप आणि प्रस्तावित शिक्षा मान्य केली, ज्यामुळे औपचारिक सुनावणीची गरज राहिली नाही. हे आरोप मैदानातील पंच पॉल रेफेल आणि अहसान रझा, तिसरे पंच शरफुद-उद-दौला इब्न शाहिद आणि चौथे पंच डेटन बटलर यांनी केले होते. सामन्याबद्दल बोलायचे झाल्यास, अँटिग्वा येथे खेळवला गेलेला दुसरा कसोटी सामना अनिर्णित राहिला. वेस्ट इंडिजने दोन कसोटी सामन्यांची मालिका १-० ने जिंकली. वेस्ट इंडिजने २३ वर्षांनंतर श्रीलंकेविरुद्ध कसोटी मालिका जिंकली. रॉस्टन चेसच्या कर्णधारपदाखाली वेस्ट इंडिजचा हा पहिला कसोटी मालिका विजय आहे.

आयसीसी जागतिक कसोटी चॅम्पियनशिप २०२५-२०२७ च्या अंक तालिकेत भारतीय संघ सध्या ४८.१५ गुणांच्या टक्केवारीसह (पीसीटी) पाचव्या किंवा सहाव्या स्थानावर संघर्ष करत आहे। भारताने आतापर्यंत एकूण ९ कसोटी सामने खेळले असून, त्यापैकी ४ सामने जिंकले आहेत, ४ मध्ये पराभव पत्करावा लागला आहे आणि एक सामना अनिर्णित राहिला आहे.

**सद्य परिस्थिती आणि अंतिम फेरीचे गणित**

शीर्ष स्थानावरील संघः ऑस्ट्रेलिया ८७.५० टक्के गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर असून, दक्षिण आफ्रिका (७५.०० टक्के) आणि न्यूझीलंड (७२.२२ टक्के) अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर आहेत.

**भारतापुढील आव्हान**

अंतिम फेरीत प्रवेश मिळवण्यासाठी भारताला उर्वरित सामने जिंकणे अत्यंत गरजेचे आहे. गुणांच्या गणितानुसार, भारताला अंतिम फेरीच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी उर्वरित सर्व १० पैकी किमान ८ सामने जिंकणे बंधनकारक मानले जात आहे. भारताचे आगामी सामनेः भारतीय संघाला अजून न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध महत्त्वाच्या मालिका खेळायच्या आहेत.

- १०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# एकजुट है भारत, नफरत छोड़कर अपनाएं मानवता का मार्ग

## गोस्वामी सुशील महाराज के वक्तव्य, ताजबाग में 'सूफी इंटरफेथ कॉन्फ्रेंस' का भव्य आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपुर**
हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट के तत्वावधान में ताजबाग में बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह के १०४ वें सालाना उर्स के आगाज अवसर पर 'सूफी इंटरफेथ कॉन्फ्रेंस' का सफल आयोजन किया गया. इस कॉन्फ्रेंस में विभिन्न धर्मों के शीर्ष धर्मगुरुओं ने शिरकत कर समाज को एकता, आपसी प्रेम और भाईचारे का संदेश दिया. इसमें भारतीय सर्वधर्म संसद के राष्ट्रीय संयोजक और महर्षि भृगु पीठाधीश्वर गुरु गोस्वामी सुशील महाराज, मुस्लिम धर्मगुरु मौलाना सैयद आले मुस्तफा कादरी मूसावी, अजमेर दरगाह के गद्दीनशीन सैयद सलमान चिश्ती, स्वामी वीर सिंह हितकारी महाराज, दिल्ली सिख गुरुद्वारा प्रबंधक कमेटी के मुख्य सलाहकार सरदार परमजीत सिंह चंडोक, भारत तिब्बत सहयोग मंच के आचार्य येशी फुनतसोक और आचार्य विवेक मुनि महाराज शामिल हुए.
कार्यक्रम में हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट के चेयरमैन प्यारे जिया खान, उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र जिचकार, सचिव ताज अहमद राजा, ट्रस्टी हाजी फारुखभाई बावला, मुस्तफाभाई टोपीवाला, हाजी इमरान खान ताजी और गजेंद्रपाल सिंह लोहिया प्रमुखता से उपस्थित थे. कार्यक्रम की प्रस्तावना सचिव ताज अहमद राजा ने रखी. मंच संचालन गयासुद्दीन अशरफी ने किया.
इस दौरान उपस्थितों को संबोधित करते हुए भारतीय सर्वधर्म संसद के राष्ट्रीय संयोजक और महर्षि भृगु पीठाधीश्वर गुरु गोस्वामी सुशील महाराज ने कहा कि भारत एक ऐसा देश है, जहां दुनिया के अलग-अलग मजहबों को मानने वाले लोग रहने के बाद भी एकजुट रहते हैं. हाल ही में हुए जी-२० सम्मेलन का जिक्र करते हुए उन्होंने कहा कि दिल्ली में तीन दिनों तक पूरी दुनिया से आए लोगों के बीच शांति और सौहार्द का पैगाम दिया गया, जो यह साबित करता है कि 'सर्वे भवंतु सुखिनः' के सिद्धांत के तहत दुनिया के सभी मानव हमारे हैं. उन्होंने इतिहास का हवाला देते हुए कहा कि इस देश में आर्य, शक, हूण, पारसी और अरबी जैसी कई संस्कृतियां आईं और आपस में मिल गईं, लेकिन हमारी मूल संस्कृति को कोई मिटा नहीं सका.
उन्होंने सरहदों और तारों के खिंचने से बने देशों पर बात करते हुए कहा कि मूल रूप से यह दुनिया एक ही थी और अब समय आ गया है कि देश को लगी नफरत की नजर को उतारा जाए. इंटरफेथ कॉन्फ्रेंस की जरूरत पर जोर देते हुए उन्होंने स्पष्ट किया कि अगर सभी मजहबों के लोग साथ बैठकर यह तय कर लें कि वे किसी दूसरे के धर्म को नीचा नहीं दिखाएंगे, तो नफरत के बीज अपने आप खत्म हो जाएंगे। दुनिया में चल रहे युद्धों और धर्मगुरुओं पर हो रहे हमलों की निंदा करते हुए उन्होंने कहा कि बुद्ध को मानने वाला कभी युद्ध का हिमायती नहीं हो सकता और हर युग में हुए युद्धों के भी कुछ नियम होने चाहिए.
उन्होंने अंत में नफरत छोड़कर एक-दूसरे को गले लगाने की अपील की और कहा कि आखिर में जीत हमेशा प्रेम और मानवता की ही होती है.

# नागपूर जिल्ह्यात बालविवाह रोखण्यात यश, १५ वर्षीय मुलीची सुटका



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर जिल्ह्यातील पिटीसूर गावात एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचा तिच्या संमतीशिवाय ३२ वर्षीय मतिमंद युवकासोबत बालविवाह लावून देण्याचा प्रयत्न पोलीस व बाल संरक्षण विभागाच्या संयुक्त कारवाईमुळे हाणून पाडण्यात आला.
विश्वसनीय गुप्त माहिती प्राप्त झाल्यानंतर पोलीस विभाग व जिल्हा बाल संरक्षण विभागाने तातडीने संयुक्त मोहीम आखून संबंधित ठिकाणी धाड टाकली. कारवाईदरम्यान मुलगी अल्पवयीन असल्याचे स्पष्ट झाले. तसेच तिची संमती नसताना विवाहाची तयारी सुरू असल्याचे निदर्शनास आले.
पथकाने तात्काळ हस्तक्षेप करून बालविवाह थांबविला आणि अल्पवयीन मुलीची सुरक्षित सुटका (रेस्क्यू) केली. त्यानंतर तिचे समुपदेशन करण्यात आले असून पुढील संरक्षणासाठी तिला बालगृहात दाखल करण्यात आले आहे. तिच्या सुरक्षिततेसाठी आणि पुनर्वसनासाठी आवश्यक ती कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.
या प्रकरणी संबंधित पालक व इतर जबाबदार व्यक्तींविरुद्ध बालविवाह प्रतिबंध अधिनियम, २००६, तसेच इतर लागू कायद्यांनुसार पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली.
जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग आणि जिल्हा बाल संरक्षण विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, आपल्या परिसरात बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास तात्काळ पोलीस, जिल्हा बाल संरक्षण कक्ष किंवा १०९८ चाइल्ड हेल्पलाइन वर माहिती द्यावी. नागरिकांच्या सतर्कतेमुळे अनेक बालकांचे भविष्य सुरक्षित करता येते, असेही प्रशासनाने नमूद केले.
या यशस्वी संयुक्त कारवाईमुळे एका अल्पवयीन मुलीचे शिक्षण, आरोग्य आणि भविष्य सुरक्षित झाले असून बालविवाहासारख्या सामाजिक कुप्रथेविरुद्ध प्रशासनाची ठाम भूमिका पुन्हा अधोरेखित झाली आहे.
जिल्हा महिला बाल विकास अधिकारी सुनील मेसरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण पोलीस निरीक्षक ललिता तोडासे, पोलीस उपनिरीक्षक अपूर्वा बोरकर, बाल संरक्षण अधिकारी साधना ठोंबरे, चाइल्ड प्रतिनिधी मीनाक्षी धडाडे, पोलीस कॉन्स्टेबल नामदेव यांनी कारवाई केली.

## संविधान चौकाचे विस्तारीकरण करून 'राष्ट्रीय संविधान प्रेरणास्थळ' घोषित करण्याची मागणी

### मुख्यमंत्र्यांना निवेदन, आंदोलनाची भूमिका स्पष्ट

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
संविधान चौक डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर विस्तारीकरण समिती च्यावतीने पत्रपरिषदेत संविधान चौकाचे तातडीने विस्तारीकरण करून संविधान चौक ते झिरो माईल परिसराचा सर्वांगीण विकास करावा, तसेच या परिसराला "राष्ट्रीय संविधान प्रेरणास्थळ" म्हणून घोषित करावे, अशी ठाम मागणी करण्यात आली.
समितीने सांगितले की, नागपूर येथील संविधान चौक हा देशातील पहिला संविधान चौक असून भारतीय राज्यघटनेतील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचे प्रतीक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी नागपूरचे ऐतिहासिक नाते असल्याने या चौकाला राष्ट्रीय स्तरावर विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.
गेल्या काही वर्षांत संविधान चौक हा विविध सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि लोकशाही आंदोलनांचे प्रमुख केंद्र बनला आहे. मात्र वाढत्या गर्दीमुळे वाहतूक कोंडी, नागरिकांची गैरसोय तसेच आपत्कालीन सेवांनाही अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे या परिसराचे नियोजनबद्ध विस्तारीकरण आणि सुशोभीकरण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे समितीने नमूद केले.

## बनावट ग्रामसभा ठरावाच्या आधारे शासकीय निधीचा अपहार?; सावरगाव प्रकरणाची चौकशीची मागणी

### दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल करून निधी वसूल करण्याची लवेश हिरूडकर यांची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
नरखेड तालुक्यातील सावरगाव येथे ग्रामसभेचा कथित बनावट ठराव तयार करून सिंचन विहिरीच्या योजनेअंतर्गत शासनाच्या निधीचा अपहार झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा तसेच शासनाच्या निधीची वसुली करण्यात यावी, अशी मागणी सावरगाव येथील रहिवासी लवेश रामरावजी हिरूडकर यांनी नरखेड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी (बीडीओ) यांच्याकडे दिलेल्या लेखी तक्रारीद्वारे केली आहे.
तक्रार अर्जानुसार, सावरगाव येथील रहिवासी संजय तुळशीराम ठोंबरे यांनी सिंचन विहिरीच्या योजनेचा लाभ घेतला. मात्र, ग्रामपंचायत सावरगाव येथे दि. ७ जून २०२२ रोजी झालेल्या ग्रामसभेत त्यांच्या विहिरीच्या दुरुस्तीबाबत कोणताही ठराव मंजूर झालेला नसल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे.
तक्रारीनुसार, संबंधित लाभार्थ्याने स्वतःच्या नावाने कथित बनावट ग्रामसभा ठराव तयार केला. याशिवाय ग्रामविकास अधिकाऱ्यांचा बनावट शिक्का व स्वाक्षरीचा वापर करून शासनाची दिशाभूल करण्यात आली आणि त्याद्वारे शासकीय निधी प्राप्त केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.
तक्रारदाराने या प्रकरणातील कागदपत्रांची न्यायवैद्यक (फॉरेन्सिक) तपासणी करून संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका तपासावी, ग्रामसभेचे मूळ इतिवृत्त, उपस्थिती नोंदवही, ठराव पुस्तिका तसेच योजनेशी संबंधित सर्व प्रशासकीय नोंदींची पडताळणी करावी, अशी मागणी केली आहे. दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर भारतीय कायद्यानुसार कठोर फौजदारी कारवाई करण्यात यावी तसेच शासनाची झालेली आर्थिक हानी संबंधितांकडून वसूल करण्यात यावी, असेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.
या तक्रारीच्या प्रती राज्याचे महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, काटोल विधानसभा मतदारसंघाचे आमदार चरणसिंग ठाकूर, नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या आहेत.
ग्रामपंचायत स्तरावर शासनाच्या विकास योजनांमध्ये पारदर्शकता राखणे आणि ग्रामसभेच्या निर्णय प्रक्रियेची विश्वासार्हता अबाधित ठेवणे अत्यंत आवश्यक असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासन या गंभीर तक्रारीची कितपत गांभीर्याने दखल घेते, चौकशीत नेमके काय निष्पन्न होते आणि संबंधितांवर काय कारवाई होते, याकडे सावरगावसह संपूर्ण नरखेड तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# इंग्लिश चॅनेलला गवसणी घालणाऱ्या 'जलपरी' गीता मालुसरे यांचे मुंबईत स्वागत



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
जागतिक जलतरण क्षेत्रातील अत्यंत अवघड मानली जाणारी 'इंग्लिश खाडी' पोहून पार करण्याचा ऐतिहासिक पराक्रम करणारी कुमारी गीता महेश मालुसरे आज भारतात परत आली, मुंबई विमानतळावार तिचे स्वागत करण्यासाठी मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे, शिवसेना उबाठा पक्षाचे दक्षिण मुंबई उपविभाग प्रमुख बाजीराव मालुसरे, महेशदादा मालुसरे यांचे कुटुंबीय, आदेश बाजीराव मालुसरे, अभिनेता कौस्तुभ केणी, कोच शेखर खासनीस उपस्थित होतो. पुण्यात पोहोचल्यानंतरही तिचे जोरदार स्वागत झाले.
रत्नागिरी येथील सागरी स्पर्धेत पोहत असताना गीताला 'जेलीफिश' या विषारी जलचराचा तीव्र दंश झाला होता. तिचा हात निकामी होण्याचा धोका निर्माण झाला होता.
हात वाचवण्यासाठी व वेदनांवर मात करत त्यांना तब्बल ११ शस्त्रक्रिया सहन कराव्या लागल्या होत्या.आपले स्विमिंग करिअर संपले असे वाटत असताना दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर गीताने पुन्हा एकदा पाण्यात उतरून हा पराक्रम केला आहे. इंग्लडमध्ये प्रॅक्टीस करताना जेली फीशने पुन्हा एकदा गीताला दंश केला होता. सुदैवाने हा दंश विशारी नव्हता. मात्र इंग्लिश खाडीत पोहत असताना जुन्या जखमांच्या वेदना ठणकत होत्या, जीवघेण्या जेलीफिश दंशाचे मानसिक दडपणही होते, मात्र असह्य वेदनांना विसरून ती फक्त आपल्या ध्येयाकडे पुन्हा झेपावत राहिली. आपले लक्ष फक्त स्वप्नावर केंद्रित केले आणि अखेर तीने इतिहास रचला. इतका संघर्ष करून मिळवलेले हे यश जगाच्या पाठीवर खरोखरच एकमेवाद्वितीय आहे. गीताने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेले हे यश जगभरात कौतुकास पात्र ठरले आहे.
वयाच्या अवघ्या तिसऱ्या वर्षापासून पोहायला सुरुवात केली होती. वयाच्या १३ व्या वर्षी 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' हा संदेश देण्यासाठी गीताने मुंबईतील प्रॉंग्ज लाइट हाउस ते गेट वे ऑफ इंडिया ते वाशी खाडी पूल हे समुद्रातील ३१ किलोमीटर अंतर अवघ्या ४ तास ५५ मिनिटांत पोहून पार केले होते. २०२२ मध्ये इस्त्राईलला झालेल्या स्पर्धेत दुसरी आली होती. रत्नागिरी मध्येही ती अपघात होऊनही दुसरी आली होती.
'इंग्लिश चॅनेल' चे अंतर ३५ किलोमीटर आहे, मात्र समुद्रातील आव्हानात्मक लाटांमुळे गीता प्रत्यक्ष पोहताना हे अंतर ५४ किलोमीटर झाले हे अंतर तिने १४ तास ३१ मिनिटांत पोहून पूर्ण केले. इंग्लिश चॅनेलचे अंतर पार केल्यानंतर यापुढे थांबायचे नाही असे गीताने ठरवले आहे. यावर्षी येणाऱ्या ऑगस्टमध्ये न्यूयॉर्कमधील ४६ किलोमीटरची 'ट्वेंटी ब्रिजेस' आणि सप्टेंबरमध्ये कॅलिफोर्नियातील ३२ किलोमीटरची 'कॅटेलिना चॅनेल' पार करण्यासाठी आत्ता सज्ज झाली आहे. गीताला जागतिक कीर्तीचा 'क्वीन ऑफ ओशन' हा बहुमान मिळवण्याचा आहे. जगातील सात प्रमुख खाड्या पोहायच्या असून, या 'सेव्हन ओशन चॅलेंज' स्वीकारण्यास तीने धडाक्यात सुरुवात केली आहे.

थोडक्यात

## एस.के.डी.व्ही. मिशनचा समाजोपयोगी उपक्रम, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप व वृक्षारोपण

### गृन्धमुनिनाम साहेबांच्या प्रगट दिनानिमित्त उमरी (वडेगाव) येथे सेवाभावी कार्यक्रम; 'जीव दया आणि आत्मपूजा'चा संदेश



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
सद्गुरू कबीर धर्मदास वंशावली (एस.के.डी.व्ही.) मिशनच्या वतीने परमपूज्य पंथ श्री हुजूर गृन्धमुनिनाम साहेब यांच्या प्रगट दिनानिमित्त नरखेड तालुक्यातील उमरी (वडेगाव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांसाठी विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले तसेच शालेय परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी सद्गुरू कबीर साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून मानवसेवा, प्रेम, अहिंसा, समता आणि बंधुभाव या मूल्यांचा प्रसार करण्याचा संकल्प करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, नैतिक मूल्ये, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक जबाबदारी याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी वक्त्यांनी सद्गुरू कबीर साहेबांचा समाजोपयोगी संदेश, प्रेम, अहिंसा व मानवतावादी विचार यांचे महत्त्व विशद केले. तसेच सोळावे वंशाचार्य पं. श्री हुजूर उदितमुनिनाम साहेब यांनी दिलेला "जीव दया आणि आत्मपूजा" हा समाजकल्याणाचा संदेश आचरणात आणण्याचे आवाहन केले. शिक्षणासोबतच संस्कार, पर्यावरण संवर्धन आणि सेवाभाव या मूल्यांची जोपासना ही काळाची गरज असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.
वृक्षारोपण उपक्रमातून विद्यार्थ्यांनी प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला. तसेच शालेय विद्यार्थ्यांना वह्या, लेखनसाहित्य आणि खाऊचे वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यात आला. मिशनच्या या उपक्रमाचे ग्रामस्थ, शिक्षक आणि पालकांनी कौतुक करत सामाजिक संस्थांनी अशा विधायक उपक्रमांतून शिक्षण क्षेत्राला सातत्याने हातभार लावावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. या प्रसंगी मिशनचे महाराष्ट्र राज्य प्रमुख दिलीपजी नाकाडे, श्रीपदराव नाकाडे, मुख्याध्यापक कळंबे सर, जिल्हा प्रतिनिधी अनिलदास महंत, मधुकर पाटील, तालुका प्रतिनिधी राजेश महंत, अमित नाकाडे तसेच मिशनचे उमरी ग्राम प्रतिनिधी, महिला प्रतिनिधी, शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप सर्व शालेय विद्यार्थी, एस.के.डी.व्ही. मिशनचे पदाधिकारी व ग्रामस्थ यांच्या सहभोजनाने उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

## मोठा ताजबागला 'अ' वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा द्यावा : भूषण दडवे यांची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
भाजपचे माजी उपाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते भूषण दडवे यांनी पत्रकार परिषद घेऊन नागपूरातील मोठा ताजबागला तातडीने 'अ' वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याची मागणी केली. या संदभार्तील प्रस्ताव शासनाकडे अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, त्यावर अद्याप निर्णय



झालेला नसल्याचा आरोप त्यांनी केला. भूषण दडवे यांनी सांगितले की, मोठा ताजबाग हे राज्यातील महत्त्वाचे धार्मिक व ऐतिहासिक स्थळ असून दरवर्षी लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात. त्यामुळे या ठिकाणाला 'अ' वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देऊन आवश्यक पायाभूत सुविधा, विकासकामे आणि पर्यटनाच्या दृष्टीने विशेष निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. याबाबत शासनाने विलंब न करता सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा लोकशाही मार्गाने पुढील आंदोलनाचा इशारा देखील भूषण दडवे यांनी पत्रकार परिषदेत दिला. यावेळी पत्रपरिषदेत मंचावरील भूषण दडवे सोबतच अँडव्होकेट महेश तायडे आणि मोहन मरोडे यांची उपस्थिती होती.

## हडस हायस्कूल नागपूर माजी विद्यार्थी संघटनेतर्फे न्यायमूर्ती अनिल किलोर व न्यायमूर्ती (नि.) मुकुलिका जवळकर यांचा सत्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
हडस हायस्कूल नागपूर माजी विद्यार्थी संघटने च्यावतीने समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा गौरव करण्याच्या परंपरेनुसार यंदा न्यायक्षेत्रातील दोन मान्यवर माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती न्यायमूर्ती अनिल किलोर (१९८२ बॅच) तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती मुकुलिका जवळकर (१९७९ बॅच) यांचा विशेष सत्कार करण्यात येईल. हा सत्कार माजी मुख्य न्यायमूर्ती भूषण धर्माधिकारी (१९७३ बॅच) यांच्या हस्ते होणार आहे. सत्कार समारंभ शनिवार, दि.११ जुलै २०२६ रोजी, सायंकाळी ६.१५ वाजता. हडस हायस्कूल, नॉर्थ अंबाझरी रोडवरील असलेल्या द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स हॉल, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमानंतर संगीत मैफल व स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. हडस हायस्कूलचे सर्व माजी विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष किरण दुरगकर व सचिव अँड.डॉ.महेंद्र लिमये यांनी केले आहे.

## आज मनपाचा झोन स्तरावर तक्रारींचे निवारण दिवस

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर महानगरपालिकेचे प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान व लोकाभिमुख करण्यासाठी महापौर निता ठाकरे यांच्या संकल्पनेतून मनपा आयुक्त डॉ. विपीन यांच्या मार्गदर्शनात महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारला प्रत्येक झोनमध्ये नागरिक तक्रार निवारण दिन साजरा केला जाणार आहे. त्यानुसार शुक्रवार १० जुलै रोजी तक्रार निवारण दिवस साजरा केला जाणार आहे. शहरातील नागरिकांना मनपाच्या कामकाजाच्या संदर्भात असलेल्या अडचणी, सेवा विषयक माहिती व समस्यांचे जलदगतीने निराकरण करण्याच्या दृष्टीकोनातून महापौर निता ठाकरे यांच्या संकल्पनेतून व उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे व सत्ता पक्ष नेता बाल्या बोरकर यांच्या पुढाकाराने हा उपक्रम सुरू करण्यात येणार आहे.

थोडक्यात

## स्वस्तिका ललित हरोडे हिचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ग्रेट ब्रिटेन इंग्लिश प्रायमरी स्कूल, नागपूर येथील इयत्ता पाचवीची



विद्यार्थिनी कु. स्वस्तिका ललित हरोडे हिने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (फेब्रुवारी २०२६) मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत शिष्यवृत्तीसाठी पात्रता मिळविली. या यशाबद्दल शाळेच्या संचालिका विजयश्री ठोबरे, संचालक मुकुंद ठोबरे, मुख्याध्यापिका इशरत जहाँ तसेच शिक्षिका कल्याणी फंदे, मेघा बावरिया आणि अश्विनी मॅडम यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

स्वस्तिकाच्या यशामागे तिची मेहनत, शिस्तबद्ध अभ्यास, कुटुंबाचे प्रोत्साहन आणि शाळेचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. तिची आई रूपा पंडित हरोडे या ज्येष्ठ पत्रकार असून त्यांनी लहानपणा पासूनच स्वस्तिकामध्ये अभ्यास व सामान्य ज्ञानाची आवड निर्माण केली. स्वस्तिकाच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## दारव्हेकर मास्तर जन्मशताब्दी रविवारी नाट्यसंगीत पुष्पांजली

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सुप्रसिद्ध नाटककार- दिग्दर्शक स्व. पुरुषोत्तम दारव्हेकर 'मास्तर' यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त स्वरआराध्य संगीत प्रतिष्ठानाने येत्या रविवारी, १२ जुलै रोजी, पांडे ले आऊटमधील दत्ताजी डिडोळकर भवनात नाट्यसंगीत पुष्पांजली कार्यक्रमाचे निःशुल्क आयोजन केले आहे. रविवारी सायंकाळी ६.३० वाजता होणाऱ्या या सोहळ्यात मास्तरांचे सुपुत्र डॉ. रंजन दारव्हेकर, ज्येष्ठ पत्रकार विनोद देशमुख आणि ज्येष्ठ गायक- संगीतकार पंडित भाऊराव लाडसे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. या कार्यक्रमात गायक सुरमणी डॉ. श्यामजी जैन, जनार्दन लाडसे, विशाखा मंगदे, रसिका करमाळेकर, ऋतुजा भुयार, वादक संदीप गुरमुले, निषाद लाडसे, निवेदक डॉ. अभिजित बोरीकर आदी सहभागी होतील.

## नबीरा महाविद्यालयात एनसीसी विभागातर्फे 'बी' व 'सी' प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

नबीरा महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेना विभागातर्फे 'बी' व 'सी' प्रमाणपत्र प्राप्त कॅडेट्सचा प्रमाणपत्र वितरण समारंभ उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला. या समारंभास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच एनसीसी कॅडेट्स मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे एनसीसी अधिकारी डॉ. अभिजीत देशमुख यांनी प्रास्ताविक करून समारंभाचा उद्देश स्पष्ट केला. त्यांनी 'बी' व 'सी' प्रमाणपत्रांचे शैक्षणिक, व्यावसायिक तसेच संरक्षण दलातील करिअरच्या दृष्टीने असलेले महत्त्व विशद केले. एनसीसीमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण, राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि सेवाभावाची जडणघडण होते, असे त्यांनी सांगितले. प्रमाणपत्र प्राप्त सर्व कॅडेट्सचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा देताना, विद्यार्थ्यांनी एनसीसीतून मिळालेली मूल्ये आयुष्यभर जपून महाविद्यालय व देशाचे नाव उज्ज्वल करावे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक तथा एनसीसी अधिकारी श्री. प्रमोद कोहळे उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी एनसीसीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ होत असल्याचे सांगितले. तसेच 'बी' व 'सी' प्रमाणपत्रधारकांना संरक्षण दल, पोलीस, निमलष्करी दल तसेच विविध शासकीय सेवांमध्ये उपलब्ध होणाऱ्या संधी व सवलतींची माहिती देत विद्यार्थ्यांनी देशसेवेचे ध्येय समोर ठेवून सातत्याने प्रयत्नशील राहावे, असे आवाहन केले.

यानंतर मान्यवरांच्या हस्ते 'बी' व 'सी' प्रमाणपत्र प्राप्त कॅडेट्सना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात यशस्वी कॅडेट्सचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. समीक्षा भलावी व कु. यशस्वी कौराती यांनी प्रभावीपणे केले, तर कु. अर्पिता उईके यांनी आभार प्रदर्शन केले. एनसीसी गीत व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## बालजगततर्फे गरीब विद्यार्थ्यांना १० जुलैला पुस्तक-वह्यांचे वितरण

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दीनदयाल शोध संस्थानच्या बालजगत अंतर्गत कार्यरत असलेल्या दीनदयाल पुस्तक पेढीतर्फे आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षीप्रमाणे यंदाही पुस्तकांचे वितरण केले जाणार आहे. हा समारंभ शुक्रवार, १० जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता बाल जगत प्रांगण, लक्ष्मीनगर येथे आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत नागपूरातील सुमारे ३० ते ३५ शाळांमधील गरीब विद्यार्थ्यांना वह्या व पुस्तकांचे वितरण करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व विचारवंत डॉ. बाबासाहेब नंदनपवार राहणार असून समाजसेविका डॉ. अभिरुची पळसापुरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

यावेळी दीनदयाल शोध संस्थानचे प्रधान सचिव निखिल मुंडले, संस्थेचे अध्यक्ष अभिनंदन पळसापुरे, प्रकल्प प्रमुख अनुजा परचुरे यांच्यासह विविध शाळांतील विद्यार्थी, शिक्षक आणि पालक उपस्थित राहतील. बाल जगत परिवारातील सर्व सदस्यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन प्रकल्प संयोजिका उत्तरा नवरे यांनी केले आहे.

# लक्ष्य निर्धारित करून सफाईची कामे पूर्ण करा!

### महापौर निता ठाकरे यांचे मनपा अधिकाऱ्यांना निर्देश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पावसाळ्याचे दिवस असल्याने घनकचरा व्यवस्थापन विभागाने लक्ष्यनिर्धारित करून रस्त्यांची साफसफाई व नालेसफाईची कामे पूर्ण करावी तसेच वाहतुकीला अडचणीचे असलेली अतिक्रमणे तात्काळ उखडून जप्त करावे व या जप्तीची माहिती, छायाचित्रे व व्हीडीओ संबंधित प्रभागातील नगरसेवकांना उपलब्ध करून द्यावी, असे स्पष्ट निर्देश महापौर निता ठाकरे यांनी मनपा अधिकाऱ्यांना दिले.

महापौर निता ठाकरे दररोज झोन कार्यालयांमध्ये जाऊन पावसाळापूर्व कामाचा आढावा घेत आहेत. याच मालिकेत महापौरांनी नेहरूनगर व गांधीबाग झोनमधील कामाचा आढावा घेतला व नगरसेवक तसेच अधिकाऱ्यांचे मत जाणून घेतले. यावेळी स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी वखरे, विरोधी पक्षनेते संजय महाकाळकर, अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम, नेहरूनगर झोनच्या सभापती सीमा ढोमणे, आरोग्य विशेष समितीच्या सभापती मनीषा अतकरे, जलप्रदाय विशेष समितीच्या सभापती दिव्या धुरडे, नगरसेवक पिंटू झलके, नगरसेवक शकील पटेल, नगरसेविका मंगला गवरे, नगरसेवक शुभम मोटघरे, नगरसेविका शारदा बारई, नगरसेवक प्रवीण गिरे, नगरसेविका रजनी वानखेडे, नगरसेविका वर्षा डोंगरे, नगरसेविका तसनीम परवीन ताजी, तसेच गांधीबाग झोनच्या नगरसेविका सय्यद मुस्कान इरफान, नगरसेवक वसीम खान, नगरसेवक सिराज अंसारी, नगरसेविका सय्यदा अंसारी, नगरसेवक सुधीर (बंडू) राऊत, नगरसेविका सारिका नांदूरकर, नगरसेविका वैशाली उदापूरकर, नगरसेवक सचिन नाईक, नगरसेविका विद्या कन्हेरे, नगरसेवक संजय बालपांडे, नगरसेविका प्रमिला गौर, नगरसेवक कल्पक भनारकर, नगरसेविका कल्पना शर्मा, नगरसेवक श्रीकांत आगलावे यांच्यासह सहाय्यक आयुक्त विकास रायबोले, सहाय्यक आयुक्त घनश्याम पंधरे, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, कार्यकारी अभियंता श्रीकांत वाईकर, कार्यकारी अभियंता प्रफुल आसलकर



तसेच मनपाचे इतर अधिकारी उपस्थित होते.

**छायाचित्रे व व्हीडीओ नगरसेवकांना पाठवा : महापौर**

महापौर निता ठाकरे यांनी प्रारंभी नेहरूनगर झोनमधील कामाचा आढावा घेतला तेथील नगरसेवकांचे मत जाणून घेतली. यावेळी नगरसेवकांनी प्रामुख्याने नाले सफाई, गडरलाईनची सफाई व अतिक्रमणाचा मुद्दा उपस्थित केले. विरोधी पक्षनेता संजय महाकाळकर यांनी प्रभागात वाढत असलेल्या अतिक्रमणाचा मुद्दा उपस्थित केला. यावर महापौर ठाकरे यांनी अतिक्रमणाची कारवाई सातत्याने करून साहित्य जप्तीची कारवाई करावी, अशी सूचना केला. त्याचप्रमाणे या जप्तीच्या कारवाईचे छायाचित्रे व व्हीडीओ संबंधित नगरसेवकांना पाठविण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. सक्करदरा भागातील अतिक्रमणे हटविण्यासाठी तात्काळ नोटीस देऊन कारवाई करण्यात यावी, जप्त केलेले सामान दूरवर नेऊन ठेवावी व ते पुन्हा लागणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सुचविले. नारळ पाणी व मटन शॉपचे दुकाने लावून अतिक्रमण करणाऱ्यावर तातडीने कारवाई करून तत्काळ अहवाल सादर करावे, असेही निर्देश महापौरांनी दिले.

पावसाळ्याचे दिवस लक्षात घेऊन घनकचरा व्यवस्थापन विभागाने लक्ष्य निर्धारित करून गडर लाईनची साफसफाई तसेच नाले सफाईचे कामे पूर्ण करावी, असे निर्देश यावेळी महापौरांनी दिले. तसेच प्रत्येक प्रभागात आकस्मिक पथक तयार सज्ज करावे, या पथकातील प्रमुखाचे मोबाईल क्रमांक नगरसेवकांना उपलब्ध करून द्यावे. प्रभागातील गाळ काढण्याचा पम्प चालू स्थितीत ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. या संदर्भात नगरसेवकांना खोटी माहिती देणाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी प्रशासनाला दिले. या झोनमध्ये सीसीटीव्हीचे जाळे वाढविण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

**रात्री कचरा उचलण्याची व्यवस्था करा : महापौर**

गांधीबाग झोनमध्ये अनेक व्यावसायिक प्रतिष्ठाने असल्याने या भागात रात्री सुद्धा कचरा उचलण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभागाने व्यवस्था सुरू करावी, असे निर्देश महापौर निता ठाकरे यांनी दिले. गांधीबाग झोनमधील नगरसेवकांनी या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. व्यावसायिक प्रतिष्ठाने बंद झाल्यानंतर दुकानदार बाहेर कचरा टाकत असल्याने रस्त्यावर घाण होते, हे टाळण्यासाठी याभागात कचरा रात्री उचलण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे या भागातील फूटपाथवर केलेली अतिक्रमणे काढण्यासाठी कारवाई करण्याची सूचना करण्यात आली. या भागात असलेले फूटपाथ लहान करून वाहतूक सुरळीत करता येईल काय, यावरही प्रशासनाने विचार करावा, अशी सूचना महापौरांनी यावेळी केली. या झोनमध्ये सिमेंट रस्त्यांसाठी असलेला निधी गडर लाईनसाठी वळविण्यात यावा, अशी मागणी नगरसेवक सुधीर (बंडू) राऊत यांनी केली. तसेच या भागातील शिकस्त झालेल्या इमारतीच्या मालकांना केवळ पावसाळ्यात नोटीस देऊ नये, ही कारवाई वर्षभर करण्यात यावी. पावसाळ्यापूर्वी नोटीस दिल्यानंतर ते पावसाळ्याचा मुद्दा उपस्थित करून शिकस्त इमारत खाली करण्यास नकार देत असल्याचे नगरसेवकांनी यावेळी निदर्शनास आणून दिले.

## आधी हक्काचा पीक विमा द्या, मग नवीन पीक विम्याची भाषा करा!

### खरीप २०२५ चा विमा अद्याप प्रलंबित; २०२६-२७ चा पीक विमा कोणत्या विश्वासावर भरायचा?, नरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांचा सरकारला संतप्त सवाल

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

खरीप २०२५ हंगामातील प्रलंबित पीक विम्याची रक्कम अद्यापही अनेक पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात जमा न झाल्याने नरखेड तालुक्यात संतापाची लाट उसळली आहे. मागील हंगामातील पीक नुकसानीची भरपाई मिळालेली नसतानाच शासनाने खरीप २०२६-२७ साठी पीक विमा भरण्याचे आवाहन सुरू केल्याने शेतकरी वर्गातून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर "आधी हक्काचा पीक विमा द्या, मग नवीन पीक विम्याची भाषा करा!" या आशयाचे पोस्टर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून त्याला नरखेड तालुक्यासह परिसरातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. हे पोस्टर केवळ प्रचाराचे साधन नसून अन्नदात्याच्या मनातील वेदना, संताप आणि न्यायासाठीच्या संघर्षाचे प्रतीक असल्याचे शेतकरी सांगत आहेत.



शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, खरीप २०२५ मध्ये अतिवृष्टी, अनियमित पाऊस, रोगराई आणि विविध नैसर्गिक संकटांमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शासनाच्या सूचनेनुसार पीक विमा भरून सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरही अनेक पात्र शेतकरी आजही विम्याच्या रकमेच्या प्रतीक्षेत आहेत. अनेकांनी तहसील कार्यालय, कृषी विभाग तसेच संबंधित विमा कंपनीकडे वारंवार पाठपुरावा केला, मात्र अद्यापही समाधानकारक कार्यवाही झालेली नाही.

"मागील हंगामातील हक्काचा विमा मिळालेला नाही, तर पुन्हा त्याच योजनेवर कोणत्या विश्वासाने पैसे भरावेत?" असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. वेळेवर विमा मिळाला असता तर बियाणे, खते, औषधे आणि शेतीच्या इतर खर्चासाठी मोठा आधार मिळाला असता. मात्र विमा रखडल्याने अनेक शेतकऱ्यांना कर्जाचा आधार घ्यावा लागत असल्याचे वास्तव आहे.


यंदा बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, डिझेल, मजुरी आणि मशागतीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यातच शेतीमालाला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत प्रलंबित विमा न देता नवीन पीक विमा भरण्याची अपेक्षा करणे म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे असल्याची भावना व्यक्त होत आहे.

याबाबत क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सागर दुधाने यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, "शेतकऱ्यांनी शासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत वेळेत पीक विमा भरला. मात्र खरीप २०२५ चा हक्काचा विमा अजूनही अनेकांना मिळालेला नाही. अशा परिस्थितीत २०२६-२७ चा नवीन पीक विमा भरण्याचे आवाहन करणे ही शेतकऱ्यांची थट्टा आहे. शासनाने आणि संबंधित विमा कंपनीने प्रलंबित दावे तात्काळ निकाली काढून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात विम्याची रक्कम जमा करावी. अन्यथा क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने नरखेड तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल. अन्नदात्याच्या संयमाचा अंत पाहू नये, अन्यथा त्याची सर्वस्वी जबाबदारी शासन आणि संबंधित यंत्रणेवर राहील."

नरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांनी शासनाकडे खरीप २०२५ चा प्रलंबित पीक विमा तात्काळ वितरित करण्याची मागणी केली असून, सर्व पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात विम्याची रक्कम जमा झाल्यानंतरच खरीप २०२६-२७ च्या पीक विमा प्रक्रियेला गती द्यावी, अशी ठाम भूमिका घेतली आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांच्या वाढत्या असंतोषाची शासनाने गांभीर्याने दखल घेऊन तातडीने निर्णय न घेतल्यास नरखेड तालुक्यासह जिल्हाभर तीव्र आंदोलन उभे राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे प्रलंबित पीक विमा तात्काळ वितरित करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

## 'ज्ञानेश्वर माऊली' संगीत नाट्याविष्कार १२ जुलै रोजी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मुद्रा इव्हेंट्सच्यावतीने संत साहित्याची परंपरा आणि वारकरी संप्रदायाचा समृद्ध वारसा जपणारा "ज्ञानेश्वर माऊली" हा संगीत नाट्याविष्कार रविवार, १२ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता लक्ष्मीनगर येथील आठरस्ता चौकातील सायंटिफिक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. संत ज्ञानेश्वरांच्या जीवनकायार्चा, अध्यात्मिक प्रवासाचा आणि त्यांच्या अमूल्य विचारांचा प्रभावी कलाविष्कार प्रथमच अभंग गायन व नाट्य प्रसंगांच्या माध्यमातून रसिकांना अनुभवता येणार आहे.

या कार्यक्रमाची संकल्पना व निर्मिती मनिषा काशीकर यांची संगीत संयोजन परिमल जोशी यांचे तर दिग्दर्शन निखिल टोंगळे यांचे आहे. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून संस्कार भारतीचे राष्ट्रीय मंत्री आशुतोष अडोणी, आविष्कार कला संस्थेच्या संचालिका स्मिता जोशी तसेच समाजसेविका अरुणा पुरोहित उपस्थित राहणार आहेत.

निवृत्तीनाथ यांच्या भूमिकेत व्यंकटेश अयाचित, संत ज्ञानेश्वर यांच्या भूमिकेत यश खेर, मुक्ताबाई यांच्या भूमिकेत गौरी सोनटक्के, तर सोपानदेव यांच्या भूमिकेत विक्रम गुरुपंच राहणार असून प्रसिद्ध गायिका डॉ. मंजिरी वैद्य अय्यर आणि आदित्य सावरकर त्यांना अभंगांची भक्तिमय जोड देतील. वारकरी परंपरेचे दर्शन घडविणारी विशेष वारी हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षक राहणार आहे.

हा कार्यक्रम निःशुल्क असून आषाढी एकादशीच्या पावन पार्श्वभूमीवर सादर होत असलेल्या या भावस्पर्शी व नाट्यमय आविष्काराला अनुभवण्यासाठी नागपूरकर रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## बाबासाहेबांवरील निष्ठेतूनच 'उजेडवास्तवाचे क्रांतिसंग्राम' घडतो : इ. झेड. खोब्रागडे

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

प्रसिद्ध आंबेडकरी कवी, लेखक, सामाजिक कार्यकर्ते तथा प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार मुरलीधर मेश्राम यांनी संकलित- संपादित केलेल्या 'उजेडवास्तवाचे क्रांतिसंग्राम' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाच्या अर्पण सभागृहात उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सनदी अधिकारी तथा संविधान फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष इ. झेड. खोब्रागडे (भा.प्र.से.निवृत्त) होते. यावेळी बोलतांना त्यांनी, "भर उन्हात ज्वालांचे शेले पांघरणारे डॉ. महेंद्रकुमार मेश्राम हे केवळ व्यवस्थेला



प्रश्न विचारणारे कवी नसून त्याच्या निराकरणासाठी रचनात्मक आणि विकासात्मक कार्य करणारे आंबेडकरनिष्ठ कार्यकर्ते आहेत. बाबासाहेबांवरील निष्ठेतूनच 'उजेडवास्तवाचे क्रांतिसंग्राम' घडतो," असे प्रतिपादन केले. संविधान फाऊंडेशन, च्या आयोजनाखाली व स्तंभ पब्लिशिंग हाऊस, चंद्रपूर यांच्या प्रकाशनातून प्रकाशित झालेल्या या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ नाटककार तथा आंबेडकराईट मुव्हमेंट ऑफ कल्चर अँड लिटरेचरचे अध्यक्ष दादाकांत धनविजय यांच्या हस्ते झाले.

यावेळी अ.भा.गौर बंजारा साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. प्रकाश राठोड, आंबेडकरी लेखक डॉ. अनमोल शेंडे, प्रकाशक कवी अविनाश पोईनकर आणि कवी सुरज दहागावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख अतिथी दादाकांत धनविजय यांनी डॉ. महेंद्रकुमार मेश्राम यांच्या साहित्यिक आणि सामाजिक जडणघडणीवर प्रकाश टाकत, त्यांच्या कविता निर्भीड, वास्तववादी आणि विद्रोही असून शोषित- वंचितांच्या वेदनांना प्रभावीपणे अभिव्यक्त करतात, असे सांगितले.

भाष्यकार डॉ. अनमोल शेंडे आणि डॉ. प्रकाश राठोड यांनीही डॉ. मेश्राम यांच्या कवितेतून संविधानिक मूल्यांचा जागर होत असल्याचे मत व्यक्त केले प्रकाशक अविनाश पोईनकर आणि कवी सुरज दहागावकर यांनी प्रकाशकीय मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार मेश्राम यांनी पुस्तकामागील संपादकीय भूमिका स्पष्ट केली. डॉ.सुशील मेश्राम यांनी संचालन केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन निर्जरा मेश्राम यांनी तर आभार छाया मेश्राम यांनी मानले. या सोहळ्यास डॉ. जयराम खोब्रागडे, लोकनाथ यशवंत, इ.मो.नारनवरे, शालिक जिल्हेकर, संजय गोडघाटे, नरेंद्र शेलार, मनोहर गजभिये, डॉ. शुभांगी वडस्कर, डॉ. नरेश कोलते, रामभाऊ आंबुलकर, सूर्यकांत मुनघाटे, डॉ.पुनम येसंबरे, संध्या राजुरकर यांच्यासह साहित्य, शिक्षण, पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर तसेच आंबेडकरवादी साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संविधान फाऊंडेशनच्या रेखा खोब्रागडे, दिपक निरंजन, छाया मेश्राम, अल्का निरंजन, विजय बेले, दिगांबर गोंडाणे, हरिदास बेलेकर, नेहा खोब्रागडे, निर्जरा मेश्राम, शिरीष कांबळे, कल्पना कांबळे, निलेश बोबडे, राजीव काथवटे,रश्मी चांदुरकर, शरदसिंह बैस, सतीश भराडे, राजेंद्र झोड, गोकुळ आष्टणकर आणि सदाशिव गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

थोडक्यात

## स्मार्ट मीटरबाबत महावितरणची जनजागृती मोहीम

### वाढीव वीज बिलाच्या १०५४ पैकी ९२७ तक्रारींचे तात्काळ निराकरण



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्यात स्मार्ट मीटर बसविण्याच्या निर्णयाला काही ठिकाणी नागरिकांकडून विरोध होत असतानाच, स्मार्ट मीटरबाबतचे गैरसमज दूर करून ग्राहकांना वस्तुस्थितीची माहिती देण्यासाठी महावितरणतर्फ नागपूर परिमंडळात व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत बुधवारी नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील विविध उपविभागांमध्ये एकूण २०० जनजागृती शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांत वाढीव वीज बिलाच्या १०५४ तक्रारी प्राप्त झाल्या, त्यापैकी ९२७ तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यात आले. अनेक ठिकाणी स्मार्ट मीटरमुळे वीजबिल वाढेल, मीटरवरून ग्राहकांचे नियंत्रण कमी होईल किंवा वीजपुरवठ्यावर परिणाम होईल, अशा प्रकारच्या शंका नागरिकांकडून व्यक्त केल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर महावितरणच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांशी थेट संवाद साधत स्मार्ट मीटरची कार्यपद्धती, त्याचे तांत्रिक स्वरूप, बिलिंग प्रक्रियेतील पारदर्शकता, वीज वापरावर नियंत्रण तसेच ग्राहकांना उपलब्ध होणाऱ्या सुविधांची सविस्तर माहिती दिली. यावेळी स्मार्ट मीटरबाबतचे गैरसमज दूर करण्यावर विशेष भर देण्यात आला.

या शिबिरांमधून वाढीव वीज बिलांच्या नागपूर ग्रामिण मंडळात (Circle) 393, नागपूर शहर मंडळात (Circle) 556 तक्रारी प्राप्त झाल्या तर वर्धा मंडळात (Circle) 105 अशा एकूण १,०५४ तक्रारी प्राप्त झाल्या यापैकी नागपूर ग्रामिण मंडळातील सर्व ३९३, नागपूर शहर मंडळातील ४४४ तर वर्धा मंडळातील ९० अशा एकूण ९२७ तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यात आले. वाढीव वीज बिलाच्या तक्रारीशिवाय इतर १६२ तक्रारी प्राप्त झाल्या त्यांचे देखील तात्काळ निराकरन करण्यात आले. या शिबिराला भेट देणाऱ्या तब्बल ७ हजार ७२६ नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.नागरिकांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना अधिकाऱ्यांनी उत्तरे देत स्मार्ट मीटरचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकही करून दाखविले. त्यामुळे ग्राहकांना मीटरची कार्यपद्धती प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली.

या मोहिमेदरम्यान नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता नाईक, अधीक्षक अभियंता संजय वाकडे (नागपूर ग्रामीण), प्रफुल लांडे (नागपूर शहर) आणि स्मिता पारखी (वर्धा) यांनी स्वतः उपस्थित राहून ग्राहकांशी संवाद साधला. "स्मार्ट मीटरमुळे अचूक रीडिंग आणि पारदर्शक बिलिंग मिळणार असून, ग्राहकांना वीज वापरावर पूर्ण नियंत्रण ठेवणे सोपे होईल," असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता, शंका असल्यास थेट महावितरणच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे. या अभियानात परिमंडलातील महावितरणचे अभियंते, तांत्रिक कर्मचारी आणि संबंधित अधिकारी सक्रियपणे सहभागी झाले. भविष्यातही ग्राहकांमधील संभ्रम दूर करण्यासाठी अशा जनजागृती मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार असून, ग्राहकांच्या तक्रारींचे तत्परतेने निराकरण करण्यावरही भर दिला जाणार असल्याचे महावितरणने स्पष्ट केले.

## सफाई कर्मचाऱ्यांसाठीच्या सदनिकांचे 'महर्षि सुदर्शन वाल्मिकी वसाहत' असे नामकरण

### उपमहापौर यांच्या अध्यक्षतेत व सत्तापक्ष नेते यांच्या उपस्थितीतील बैठकित निर्णय



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेचे सत्तापक्ष नेते नरेद्र(बाल्या) बोरकर यांच्या सभा कक्षात उपमहापौर लिला हाथीबेड यांच्या अध्यक्षतेखाली वाल्मिकी समाज बांधवांच्या प्रतिनिधींची बैठक पार पडली. बैठकीत सफाई कर्मचाऱ्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या सदनिकांचे नाव महर्षि सुदर्शन वाल्मिकी वसाहत असे करण्याच्या सत्तापक्ष नेते नरेंद्र बोरकर यांच्या प्रस्तावाला उपस्थितांनी एकमताने मंजुरी प्रदान केली. मौजा नारी येथे सफाई कर्मचारी यांच्याकरिता ३९२ इडब्ल्यूएस सी सदनिका प्रकल्प उभारण्यात येत आहे. या प्रकल्पाचे भूमिपूजन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे महसूल तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर निता ठाकरे, स्थायी समिती सभापती श्रीमती शिवानी दाणी वखरे यांच्यासह सर्व आमदार यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार १२ जुलै रोजी होणार आहे.

त्याअनुषगाने उपमहापौर लिला हाथीबेड यांच्या अध्यक्षतेखाली वाल्मिकी समाज बांधवांच्या प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली. यावेळी ज्येष्ठ नगरसेवक सुधीर(बंडू) राऊत, नगरसेवक विजय होले, नगरसेवक रितेश गावंडे, मनपाच्या मुख्य अभियंता श्रीमती लीना उपाध्ये यांच्यासह सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते. शहराला स्वच्छ, सुंदर आणि स्वस्थ राखण्यासाठी अहोरात्र कार्यरत असणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या सदनिकांच्या नावाबद्दल बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी भूमिपूजन कार्यक्रमाच्या नियोजनाबद्दल सविस्तरपणे चर्चा करण्यात आली.

# सौरभ पवार प्रकरणी नागपूरात न्यायासाठी पारधी समाज संघटनेचा एल्गार

### विशेष चौकशी समिती व दोषींवर कारवाईच्या मागणीसाठी धरणे आंदोलन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जिल्हा परिषद नागपूरच्या रामटेक उपविभागात कार्यरत असलेले कनिष्ठ अभियंता स्व. सौरभ धर्मराज पवार यांच्या संशयास्पद आत्महत्या प्रकरणाची निष्पक्ष, सखोल आणि पारदर्शक चौकशी करून पीडित कुटुंबाला न्याय मिळावा, या मागणीसाठी सोमवारी व मंगळवारी नागपूर येथे विविध पारधी समाज संघटनांच्या संयुक्त विद्यमाने शांततापूर्ण धरणे आंदोलन करण्यात आले.

आदिवासी पारधी विकास परिषद, अखिल भारतीय आदिम महासंघ, महाराष्ट्र राज्य आदिवासी फासेपारधी कर्मचारी संघटना, श्री दादाजी फासे पारधी समाज संघटना आणि पारधी विकास परिषद यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद कार्यालयासमोर हे आंदोलन पार पडले.

आंदोलनापूर्वी विविध संघटनांच्या शिष्टमंडळाने नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष ए. पोद्दार, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रवीण माहिरे,जिल्हा परिषद नागपूरचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी कमलकिशोर फुटाणे यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. निवेदनात प्रकरणाचा पोलीस प्रशासनामार्फत निष्पक्ष व पारदर्शक तपास करण्यात यावा, दोषी आढळणाऱ्या अधिकारी व संबंधित व्यक्तींवर भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हे नोंदवावेत तसेच आवश्यकतेनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ अंतर्गत कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

यानंतर आंदोलनकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद कार्यालयासमोर शांततापूर्ण धरणे आंदोलन करत न्यायासाठी घोषणाबाजी केली. आंदोलनानंतर शिष्टमंडळाने पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक अनिल मस्के, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रवीण माहिरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कमलकिशोर फुटाणे आणि निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खोंडे यांना लेखी निवेदन सादर केले.

निवेदनात या प्रकरणासाठी स्वतंत्र विशेष चौकशी समिती गठित करून निष्पक्ष, सखोल व पारदर्शक चौकशी करण्यात यावी, चौकशी अहवाल तातडीने शासनाकडे सादर करावा आणि दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर भारतीय न्याय संहिता तसेच लागू असल्यास अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

शिष्टमंडळाने निवेदनात गंभीर आरोप करत म्हटले आहे की, स्व. सौरभ पवार यांना उपविभागीय अभियंता रत्नदीप रामटेके यांच्याकडून कथित मानसिक छळ, जातीय भेदभाव आणि सातत्यपूर्ण प्रशासकीय दबावाला सामोरे जावे लागले. या आरोपांची स्वतंत्र चौकशी करून ते सिद्ध झाल्यास संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

आंदोलनकर्त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, हा केवळ एका अधिकाऱ्याच्या मृत्यूचा प्रश्न नसून शासन व्यवस्थेतील पारदर्शकता, उत्तरदायित्व, कर्मचारी सुरक्षा आणि न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास यांच्याशी संबंधित अत्यंत गंभीर विषय आहे. त्यामुळे कोणताही पक्षपात न करता सत्य जनतेसमोर आणून दोषींना शिक्षा देण्यात यावी, अशी एकमुखी मागणी करण्यात आली.

या आंदोलनात श्री दादाजी फासे पारधी समाज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष मतीन भोसले, आदिवासी पारधी विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष अनिल पवार, युवा विकास परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अतिश पवार, महाराष्ट्र राज्य आदिवासी फासेपारधी कर्मचारी संघटनेचे संस्थापक धर्मराज भोसले, अखिल भारतीय आदिम महासंघाचे कोषाध्यक्ष मंगल भोसले, पारधी विकास परिषद विदर्भ प्रांताचे महामंत्री प्रवीण पवार, देशराज पवार, यवतमाळ जिल्हाध्यक्ष वनीश भोसले, राहुल राजपूत यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि प्रतिनिधी सहभागी झाले.

**"न्यायासाठी संघर्ष सुरूच राहणार"**

सौरभ पवार यांच्या मृत्यू प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत न्यायासाठीचा लढा सुरूच राहील, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला दिला.

## आपली बसची ऐतिहासिक कामगिरी, एका दिवसात १,९७,०९६ प्रवाशांची सर्वोच्च विक्रमी नोंद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरकरांचा वाढता विश्वास आणि पसंती मिळवत (म.न.पा) आपली बसने दि. ६ जुलै २०२६ रोजी एका दिवसात १,९७,०९६ प्रवाशांची सर्वोच्च विक्रमी प्रवासी संख्या नोंदवून ऐतिहासिक टप्पा गाठला आहे.



याच दिवशी ३५,५४७ यूपीआय तिकीट व्यवहारांची सर्वोच्च विक्रमी नोंद झाली असून, यावरून प्रवाशांमध्ये डिजिटल तिकीट प्रणाली व कॅशलेस प्रवासाचा वाढता स्वीकार स्पष्ट होत आहे.

(म.न.पा) आपली-बस चा ताफा ७३० बसेसचा झाला. या बसेस ९ डेपो मधून कार्यरत असून, दररोज लाखो नागरिकांना सुरक्षित, परवडणारी, विश्वासार्ह आणि सोयीस्कर सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध करून देत आहे. सेवांमध्ये सातत्याने होत असलेली सुधारणा, बस ताफ्यातील वाढ आणि डिजिटल तिकीट प्रणालीला दिलेले प्रोत्साहन यामुळे हा उल्लेखनीय टप्पा गाठणे शक्य झाले आहे.

ही उल्लेखनीय कामगिरी (म.न.पा) आपली बस परिवहन समितीच्या अध्यक्षा मंगला खेकरे यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली साध्य झाली असून, त्यांच्या दूरदृष्टीमुळे आणि प्रभावी नेतृत्वामुळे शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला अधिक बळकटी मिळाली आहे.

नागपूर महानगरपालिका (म.न.पा) व आपली बस सर्व प्रवाशांचे त्यांच्या सातत्यपूर्ण विश्वास आणि सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त करतेचलोतसेच या ऐतिहासिक यशामध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या चालक, वाहक, डेपो कर्मचारी तसेच चलो च्या संचालन पथकाच्या समर्पित सेवांचेही मनःपूर्वक कौतुक करीत आहे.

## ज्येष्ठ साहित्यिक, कलावंतांना मानधनासाठी अर्ज करण्याचे आवाहन

### दिव्यांगांसाठी वयोमर्यादा शिथिल

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्य शासनाच्या 'राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजना' अंतर्गत कला व साहित्य क्षेत्रात योगदान असलेल्या मान्यवर ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना प्रतिमहा ५ हजार रुपये मानधन देण्यात येते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थींनी महाराष्ट्र शासनाच्या https://aaplesarkar.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर १ जुलै २०२६ ते २१ जुलै २०२६ या कालावधीत ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

योजनेसाठी लाभार्थ्यांचे वय ५० वर्षांपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. मात्र, दिव्यांगांसाठी वयाची अट १० वर्षांनी शिथिल करण्यात आली असून त्यांच्यासाठी वयोमयार्दा ४० वर्षे आहे. अर्जदाराचे कला व साहित्य क्षेत्रातील योगदान किमान १५ वर्षांचे असावे. तसेच त्यांनी साहित्य व कलाक्षेत्रात सातत्यपूर्ण, दजेर्दार व मोलाची भर घातलेली असावी.

योजनेअंतर्गत वयाने ज्येष्ठ, विधवा, परित्यक्ता व दिव्यांग कलाकारांना प्राधान्य दिले जाणार आहे. कलाकाराचे सर्व मार्गांनी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ६० हजार रुपयांपेक्षा जास्त नसावे. त्याचप्रमाणे कलाकारांची उपजीविका केवळ कलेवर अवलंबून असणे आवश्यक आहे तसेच कलाकार केवळ कलेवरच अवलंबून असणे आवश्यक आहे. इतर कोणत्याही मार्गाने उत्पन्न नसलेले कलाकार, केंद्र किंवा राज्य शासनाची महामंडळे अथवा इतर कोणत्याही नियमित मासिक पेन्शन योजनेत अंतर्भूत नसलेले पात्र कलाकार यासाठी पात्र ठरणार आहेत. कलाकार/साहित्यिक हे महाराष्ट्राचे रहिवासी असणे बंधनकारक आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांनी मुदतीत आपले सरकार पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी, नागपूर तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय समिती, नागपूर यांनी केले आहे.

ऑनलाइन अर्जासाठी वयाचा दाखला, आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, प्रतिज्ञापत्र, पती-पत्नीचा एकत्रित फोटो (लागू असल्यास), बँक पासबुक, अपंगत्वाचा दाखला (लागू असल्यास), राज्य अथवा केंद्र शासनाचे पुरस्कार प्रमाणपत्र (लागू असल्यास), नामांकित संस्था अथवा व्यक्तीचे शिफारसपत्र (लागू असल्यास) तसेच विविध पुरावे आदी कागदपत्रे आवश्यक असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

## भंडारा येथे उद्या महायुतीतर्फे भव्य सत्कार सोहळा

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

भंडारा व गोंदिया जिल्हा महायुतीच्या वतीने नुकत्याच पार पडलेल्या राज्यसभा सदस्य आणि भंडारा-गोंदिया स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे उमेदवार म्हणून विजय मिळवून नवनिर्वाचित राज्यसभा खासदार श्री राजेंद्र जैन आणि नवनिर्वाचित विधान परिषद आमदार श्री अविनाश ब्राह्मणकर यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सत्कार सोहळा शनिवार, दि. ११ जुलै २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता, लक्ष्मी सभागृह (जे. एम. पटेल जवळ), भंडारा येथे संपन्न होणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटक राज्याचे महसूल मंत्री नामदार चंद्रशेखरजी बावनकुळे, अध्यक्षस्थानी खासदार प्रफुल पटेलजी व प्रमुख अतिथी म्हणून भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकजजी भोयर, गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रनिलजी नाईक तसेच आमदार परिणयजी फुके यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. विशेष अतिथी म्हणून आमदार राजकुमार बडोले, आमदार विजय रहांगडाले, आमदार विनोद अग्रवाल, आमदार नरेंद्र भोंडेकर, आमदार राजूभाऊ कारेमोरे, आमदार संजय पुराम, जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, भाजपा संघटक विरेंद्र (बाळा) अंजनकर, बीडीसीसी बँकेचे अध्यक्ष सुनील फुंडे तसेच प्रदेश महासचिव धनंजय दलाल उपस्थित राहणार आहेत.

तरी या भव्य सत्कार सोहळ्यास महायुतीचे सर्व वरीष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपा जिल्हाध्यक्ष आसू गोंडाने, सीताताई रहांगडाले, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष नानाभाऊ पंचबुद्धे, प्रेमकुमार रहांगडाले, शिवसेना जिल्हाध्यक्ष अनिल गायधने आणि मुकेश शिवहरे व महायुतीच्या सर्व वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आव्हान केले आहे.

# विजयाबाई मेहता यांच्या स्मृतींना मिळाला उजाळा

### अभिवाचनातून अर्पण केली भावपूर्ण श्रद्धांजली

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भ साहित्य संघ, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद आणि डॉ. गिरीश गांधी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ दिग्दर्शिका, निर्मात्या आणि अभिनेत्री विजयाबाई मेहता यांना अभिवाचनाद्वारे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यानिमित्ताने त्यांच्या स्मृतींना उजाळा मिळाला.

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नागपूर शाखेचे अध्यक्ष डॉ. अजय पाटील यांच्यासह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

प्रारंभी ज्येष्ठ नाटककार महेश एलकुंचवार यांनी विजयाबाई मेहता यांच्याविषयी लिहिलेल्या श्रद्धांजलीपर लेखाचे अभिवाचन रवींद्र दुरुगकर यांनी केले. या लेखातून त्यांनी विजयाबाईंच्या निधनाने भारतीय रंगभूमीची झालेली मोठी हानी, मराठी रंगभूमीला त्यांनी दिलेला नवा दृष्टिकोन, नवोदित लेखकांना दिलेले व्यासपीठ आणि प्रायोगिक रंगभूमीच्या उभारणीत त्यांनी बजावलेली महत्त्वपूर्ण भूमिका यावर रवींद्र दुरुगकर यांनी नव्याने प्रकाश टाकला.




यानंतर विजयाबाईंच्या झिम्मा या आत्मचरित्रामधील निवडक उताऱ्यांचे अभिवाचन अंजली दुरुगकर, रेखा घिया-दंडिगे आणि स्वाती हुद्दार यांनी केले. रंगभूमीवरील अवकाश, काळ, नाट्यभाषा, प्रायोगिक रंगभूमीचा प्रवास आणि विजयाबाईंची सौंदर्यदृष्टी प्रभावीपणे या कलाकारांनी प्रभावीपणे उलगडली. तसेच महेश एलकुंचवार आणि विजयाबाई यांच्यातील सर्जनशील नाते, प्रायोगिक रंगभूमीची ध्येयवादी भूमिका आणि मराठी नाटकाला त्यांनी दिलेली नवी दिशा यावरही त्यांनी प्रकाश टाकला.

ज्येष्ठ संगीतकार भास्कर चंदावरकर यांनी 'रंग भास्कर' या पुस्तकात विजयाबाईंवर लिहिलेल्या लेखाचे अभिवाचनही रवींद्र दुरुगकर यांनी केले. या लेखातून 'रंगायन'च्या माध्यमातून विजयाबाईंनी प्रायोगिक रंगभूमीची चळवळ उभी केली, मराठी रंगभूमीच्या पहिल्या महिला दिग्दर्शक म्हणून अनेक कलाकार व दिग्दर्शक घडवले आणि एनसीपीएच्या कार्यकारी संचालक म्हणूनही उल्लेखनीय कार्य केले, याचा गौरव करण्यात आला. या उत्कृष्ट अभिवाचनाला सोहम जहागिरदार यांच्या सुरेल बासरीच्या लाभलेल्या पार्श्वस्वरांमुळे संपूर्ण कार्यक्रमात भावपूर्ण वातावरण तयार झाले.

या कार्यक्रमाला विदर्भ साहित्य संघाचे पदाधिकारी विलास मानेकर, अरुणा सबाने, विष्णू मनोहर, अमर कुळकर्णी यांच्यासह नाट्य परिषदेचे नरेश गडेकर आदी साहित्य व नाट्य क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती मोहरीर यांनी केले तर डॉ. अजय पाटील यांनी आभार मानले.